दैनिक

# लक्ष महाराष्ट्र

रुबाबदार राज्याचा, जबाबदार विचार...

नाशिक, नंदुरबार, धुळे, जळगाव येथून एकाचवेळी प्रकाशित.

▶ RNI No.MAHMAR/2019/79184

www.lakshamaharashtra.com | lakshamaha.dhule@gmail.com | lakshamaha.nsk@gmail.com

▶ धुळे-नंदुरबार-नाशिक आवृत्ती ▶ वर्ष ४ थे ▶ अंक : २६८ वा ▶ सोमवार दि. २४ जुलै २०२३ ▶ किंमत : २ रु. ▶ पृष्ठे : ६

## मंत्रिमंडळ विस्तारात महिलांना स्थान मिळेल: चित्रा वाघ



**मुंबई ।** पुढील मंत्रिमंडळ विस्तारात दोन ते तीन महिला आमदारांना स्थान मिळावे, असा आग्रह पक्षाकडे धरला असून आणि पक्षानेही याला मान्यता दिलेली आहे. मंत्रिमंडळात महिला मंत्री दिसतील, असे चित्रा वाघ यांनी दावा केला आहे. यावेळी, वाघ म्हणाल्या, पक्षात महिलांना नेहमीच प्राधान्य दिले जाईल. आगामी निवडणुकातही महिला मोठ्या संख्येने सहभागी होतील. आजही विधानसभा आणि विधानपरिषदेत पक्षाच्या सर्वाधिक महिला आमदार आहेत, त्या उत्तम काम करतील.

## न्यूज कॉलम

### महिलेस मारहाण; चौघांविरुद्ध गुन्हा

**धुळे ।** पायवाट वापरण्याच्या कारणावरून वाद घालून रजेसिंग नवा मालचे, दादाभाऊ रजेसिंग मालचे, मनुबाई रजेसिंग मालचे व मायाबाई रजेसिंग मालचे (सर्व रा. रोहाणे, ता. शिंदखेडा) यांनी भुराबाई राजू मालचे (रा. रोहाणे) यांना शिवीगाळ व मारहाण केली. याप्रकरणी भुराबाई भिल यांच्या फिर्यादीवरून चौघांविरुद्ध शिंदखेडा पोलिस ठाण्यात गुन्हा दाखल झाला.

### तरुणावर हल्ला; चौघांवर गुन्हा

**धुळे ।** शहरातील वडजाई रोडवरील हाजीनगरात मोहम्मद असद अख्तर हुसेन अन्सारी याच्याशी अब्दुल अहाद आबिद हुसेन, ऐमन आबिद हुसेन व इतरांनी वाद घातला. नंतर तीक्ष्ण हत्याराने डोक्यात वार करून जखमी केले.

### दुकानात चोरी; दोन जण ताब्यात

**धुळे ।** दहिवेल (ता. साक्री) येथील पिंपळनेर रोडवरील किराणा दुकानाचे कुलूप तोडून चोरी करणाऱ्या दोघांना ताब्यात घेण्यात आले. सुनील सोनवणे, रामलाल भोये अशी त्यांची नावे आहेत. दुकानमालक महेश सोनवणे यांच्या तक्रारीवरून गुन्हा नोंद झाला.

# शिंदेंना मुख्यमंत्री करण्यास दिल्ली तयार नव्हती; फडणवीसांचा गौप्यस्फोट

**मुंबई । प्रतिनिधी**

खुपते तिथे गुप्ते कार्यक्रमात उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीसांनी काही खुलासे केले आहेत. गेल्या आठवड्यात फडणवीस यांची मुलाखत असलेला भाग प्रकाशित झाला. आज फडणवीस यांनी या भागावर काही ट्विट केले आहेत. यामध्ये फडणवीस यांनी एकनाथ शिंदेंना मुख्यमंत्री करण्यासाठी कोणी शिफारस केली, या मागची स्टोरी सांगितली आहे.

एकनाथ शिंदे यांना मुख्यमंत्री केल्यानंतर देवेंद्र फडणवीसांचे पंख छाटल्याची चर्चा महाराष्ट्रात होत होती. तेव्हा खरोखच देवेंद्र फडणवीस शॉक झाले होते. परंतू शिंदेंनी मुख्यमंत्री केले म्हणून नाही, तर त्यांना प्रदेशाध्यक्ष करायचे सोडून उपमुख्यमंत्री केल्याबद्दल देवेंद्रना आश्चर्य वाटले होते. यामागचा गेम प्लॅन वेगळाच होता. एकनाथ शिंदेंना मुख्यमंत्री बनविण्याचा प्रस्ताव कोणी दिलेला? यावर फडणवीस यांनी मी आणि एकनाथ शिंदे भेटलो तेव्हा हे सरकार आपल्या विचारांना पटणारे नाही, असे एकमत झाले. मी ठरविले होते की मी मुख्यमंत्री होणार नाही. सरकार बदलण्यावर चर्चा झाली, हिंदू आणि हिंदुत्वाचा दम घुटत होता. तेव्हा मी एकनाथ शिंदे एवढे मोठे पाऊल उचलतायत तर त्यांनीच मुख्यमंत्री व्हायला हवे असे मत मांडले. दिल्लीत गेलो, वरिष्ठांना हे सांगितले. त्यांना समजावण्यात खूप वेळ गेला. माझ्या पक्षाने लगेचच माझा प्रस्ताव स्वीकारला नाही, असे फडणवीस म्हणाले.

एकनाथ शिंदे एवढे मोठे पाऊल उचलणार आहेत, त्यांनाच नेता बनवावे यावर पक्षाचे नेते सहमत होते, परंतू ते लोकांमध्ये विश्वास निर्माण करू शकतील का? या सवालावर सारे अडले होते. परंतू, काही दिवसांनी दिल्लीतील नेत्यांनी एकनाथ शिंदेंना मुख्यमंत्री करण्यावर होकार दिला, असे फडणवीस म्हणाले.

मला प्रदेशाध्यक्ष व्हायचे होते. तशी वरिष्ठांशी बोलणीही झाली होती. मी सरकारमध्ये राहणार नाही असे त्यांना सांगितले होते. प्रदेशाध्यक्ष बनून मी ती जबाबदारी पार पाडेन असे सांगितलेले. कठोर मेहनत घेऊन पुढील दोन वर्षांत पक्षाला एक नंबरला नेईन, सर्वकाही असे ठरले. पण ऐनवेळी मला उपमुख्यमंत्री करण्यात आले तेव्हा मला धक्का बसला असे फडणवीस म्हणाले.

मी मुख्यमंत्री होणार नाही हे मी ठरवलं होतं. एकनाथ शिंदे यांच्याशी माझं बोलणं झालं. हे सरकार बदललं पाहिजे, हे सरकार आपल्या विचाराने चालू शकत नाही. तिथे हिंदुत्ववाद्यांचा जीव गुदमरतोय, यावर आमचं एकमत झालं. तेव्हा एकनाथ शिंदे मुख्यमंत्री झाले पाहिजे हा विषय मी मांडला. मी माझ्या पक्षाकडे गेलो. माझ्या पक्षाला मी सांगितलं शिंदेंना आपण मुख्यमंत्री केलं पाहिजे. माझ्या पक्षाला कन्व्हिन्स करण्यासाठी मला बराच काळ द्यावा लागला. माझ्या पक्षाने माझा प्रस्ताव लगेच स्वीकारला नव्हता. एकनाथ शिंदे एवढं मोठं पाऊल उचलतात. अशा परिस्थितीत त्यांचं नेतृत्व असलं पाहिजे. त्यांच्या लोकांना ते आत्मविश्वास देतील. आणि हा निर्णय झाला, असं देवेंद्र फडणवीस यांनी सांगितलं.



### तो माझ्यासाठी धक्का होता

घरी आल्यावर माझ्या नेत्याने सांगितलं तुला उपमुख्यमंत्री व्हायचं आहे. हा माझ्यासाठी धक्का होता. मुख्यमंत्री असताना उपमुख्यमंत्री होणार याचं मला दु:ख नव्हतं. खालच्या पदावर जातो याचं दु:ख नव्हतं. पक्षाने सांगितलं तर मी चपरासी होईल. चिंता याची होती की लोक म्हणतील हा सत्तेसाठी किती हपापला आहे. कालपर्यंत मुख्यमंत्री होता, आता सत्तेसाठी उपमुख्यमंत्री झाला. पण माझ्या नेत्यांनी जे नरेटिव्ह तयार केलं त्यामुळे माझी उंची वाढली. पंतप्रधानांनी ट्विट केलं, त्यानंतर लोकांचा संभ्रम दूर झाला, असंही त्यांनी स्पष्ट केलं.

### विजयाचा आनंद होता

राज्यपालांना या मुख्यमंत्री पदाच्या घडामोडींची कल्पनाच नव्हती. जेव्हा शिंदे आणि मी पत्र द्यायला गेलो तेव्हा आम्ही दोघे आणि वरचे तीन नेत्यांनाच हे माहिती होते. राज्यपालांना शिंदे मुख्यमंत्री बनतील असे पत्र दिले तेव्हा त्यांनाही आश्चर्य वाटले. मी त्यांना हेच ठरले असल्याचे सांगितले. यानंतर मी पीसी घेऊन शिंदेंच्या नावाची घोषणा केली. तेव्हा माझ्या चेहऱ्यावर चिंता किंवा दु:ख नव्हते. तर विजयाचा आनंद होता, परंतू तो जास्त वेळ टिकू शकला नाही, असेही फडणवीस म्हणाले.

### मला अध्यक्ष व्हायचं होतं

एकनाथ शिंदे यांना मुख्यमंत्री करण्याचा प्रस्ताव दिल्यानंतर मी सरकारमध्ये राहणार नाही, असं मी माझ्या पक्षाला स्पष्टपणे सांगितलं होतं. मी पक्षाचा प्रदेश अध्यक्ष होईल किंवा मला जी जबाबदारी द्याल ती घेईल. दोन वर्ष मेहनत करून पक्षाला क्रमांक एकचा पक्ष करतो, असं पक्षाला सांगितलं. त्याप्रमाणे सर्व ठरलं होतं, असा दावा फडणवीस यांनी केला.



## तीन पिस्तूलसह आठ जिवंत काडतुसे व कार जप्त

### शिरपूर पोलिसांची कारवाई

**शिरपूर । प्रतिनिधी**

आयजी पथकाच्या कारवाईनंतर धुळे जिल्ह्यातील पोलीस यंत्रणा अलर्ट झाली आहे. शिरपूर तालुका पोलीस देखील सतर्क झाली असून दोन दिवसांपूर्वी मुंबई आग्रा महामार्गावर दोन संशयितांकडून चार पिस्तूल व जिवत काडतुसे जप्त करण्यात आली होती. काल पुन्हा शिरपूर तालुका पोलीसांनी तीन पिस्तूल आठ जिवंत काडतुसे व स्विफ्ट कार जप्त करत एका संशयिताला ताब्यात घेतले आहे.

शिरपूर तालुका पोलीस स्टेशनचे सा. पोलीस निरीक्षक जयेश खलाणे यांना गोपणीय माहिती प्राप्त झाली होती. त्या माहितीच्या अधारे शिरपूर तालुका पोलीसांनी भोईटी गावाजवळ सापळा लावला. त्यादरम्यान एम. एच १२ क्यु जि ०४७२ क्रमांकाची स्विफ्ट कार संशयित रित्या येतांना दिसली पोलीसांनी कारला थांबवण्याचा प्रयत्न केला असता कार थांबली नाही. पोलीसांनी कारचा पाठलाग करत कारला थांबवण्यात आली. कार मधील सईद आस मोहम्मद सय्यद वय ३१ वर्ष रा.श्रीरामपूर जि.अहमदनगर नामक संशयिताला ताब्यात घेत अंगझडती व कारची पाहणी केली असता त्याच्याकडे १ लाख ३५ हजार किंमतीचे मॅगझीनसह तीन बनावट पिस्तूल व आठ जिवंत काडतुसे मिळुन आली.पोलीसांनी स्विफ्ट कारसक्ष मुद्देमाल जप्त करत संशयिताविरुध्द गुन्हा दाखल केला.


सदरची कारवाई पोलीस अधीक्षक संजय बारकुंड, अप्पर पोलीस अधीक्षक किशोर काळे, उपविभागीय पोलीस अधिकारी सचिन हिरे यांच्या मार्गदर्शनाखाली शिरपूर तालुका पोलीस स्टेशनचे प्रभारी अधिकारी सा. पोलीस निरीक्षक जयेश खलाणे,उपनिरीक्षक संदिप पाटील, कृष्णा पाटील, सागर ठाकूर, संतोष पाटील, योगेश मोरे, रोहिदास पावरा व चालक इसरार फारुकी आदींनी केली.

## अमित ठाकरेंचा ताफा अडवल्याने टोल नाक्यावर मनसैनिकांकडून तोडफोड

**नाशिक । प्रतिनिधी**

सिन्नर तालुक्यातील गोंदे फाटा येथे असलेल्या समृद्धी महामार्गाच्या टोल नाक्यावर मनसे नेते अमित ठाकरे यांच्या वाहनांचा ताफा टोल कर्मचाऱ्यांनी अडवून त्यांना अर्धा तास थांबविले होते. यावेळी अमित ठाकरेंनी ओळख देऊनही टोल कर्मचाऱ्यांनी त्यांना अपमानास्पद वागणूक दिल्याचा आरोप मनसेच्या कार्यकर्त्यांकडून करण्यात आला.

त्यानंतर काही मनसेच्या पदाधिकाऱ्यांनी हातात लाठ्या-काठ्या घेऊन मध्यरात्रीच्या सुमारास टोल नाक्यावर जात टोलनाक्याची तोडफोड केली. यावेळी टोल नाक्यावरील कर्मचाऱ्यांनी तेथून काढता पाय घेतला. या प्रकारामुळे टोल नाक्यावर बराच वेळ तणावाचे वातावरण निर्माण झाले होते. यानंतर वावी पोलिसांनी घटनास्थळी धाव घेत सीसीटीव्ही फुटेज व व्हायरल व्हिडिओच्या माध्यमातून पुढील तपास सुरु केला आहे. अशातच आता या



सर्व घडलेल्या प्रकाराबाबत मनसे नेते अमित ठाकरे यांनी प्रतिक्रिया दिली आहे. ते म्हणाले की, शिर्डीत साईबाबांच्या दर्शनानंतर वैयक्तिक कामासाठी समृद्धी महामार्गाने नाशिकला निघालो होतो. महासंपर्क अभियानाच्या दौऱ्यात पोलीस बांधव थकल्याने मी त्यांना शिर्डीच्या शासकीय विश्रामगृहात विश्रांती करण्यास सांगितले. यावेळी टोलनाक्यावर फास्टटॅगमधून टोल कट न झाल्याने दहा ते पंधरा मिनिटे टोल कर्मचाऱ्यांनी गाडी थांबवली. त्यावेळी आम्ही त्यांना टेक्निकल इशू बाबत सांगितले मात्र, कर्मचारी उद्धट भाषा वापरत होते, असे ठाकरे म्हणाले.

पुढे बोलताना अमित ठाकरे म्हणाले की, त्यानंतर माझ्या सहकाऱ्यांनी टोल कर्मचाऱ्यांना सांगितले की हे अमित ठाकरे आहेत. यानंतर कर्मचाऱ्यांनी व्यवस्थापकाला देखील फोन लावला. मात्र व्यवस्थापक देखील उद्धट भाषा वापरत होता. पंधरा ते वीस मिनिट गाडी थांबवून ठेवली आणि नंतर सोडली. त्यानंतर सिन्नर येथील मनसेच्या पदाधिकाऱ्यांना ही घटना समजल्यानंतर त्यांनी टोल नाका फोडला. मला नाशिकला पोहोचल्यावर कळले की कार्यकर्त्यांनी टोल फोडला, असे ठाकरे यांनी सांगितले.

## नाशिकच्या बोधले नगरमध्ये भर रस्त्यात तरुणाला संपवलं

### सिनेस्टाईल दुचाकीचा पाठलाग करुन हल्ला

**नाशिक । प्रतिनिधी**

शहरात गुन्हेगारीचा आलेख चढताच असून दिवसाआड खुनाच्या घटनांनी नाशिक हादरत आहे. अशातच एका तरुणाचा दुचाकीवर सिनेस्टाईल पाठलाग करुन अंगावर चॉपरने सपासप वार करुन हत्या करण्यात आल्याची धक्कादायक घटना रात्री उशिरा घडली आहे.

नाशिक- पुणे मार्गावरील उपनगरच्या परिसरात हा प्रकार घडला आहे. उपनगर पोलीस ठाण्याच्या हद्दीत बोधले नगर परिसरात युवकाच्या अंगावर चॉपरने सपासप वार करुन हत्या करण्यात आली. तुषार देवराम चौरे असे मृत युवकाचे नाव आहे. याप्रकरणी रात्री उशिरापर्यंत पंचनामा आणि गुन्हा दाखल करण्याचे काम सुरु होते. दरम्यान, पूर्व वैमनस्यातून तुषारच्या ओळखीतल्या मित्रांनीच त्याची हत्या केल्याचा पोलिसांचा प्राथमिक अंदाज आहे. एखाद्या चित्रपटाप्रमाणे हा प्रसंग बोधले नगरच्या रस्त्यावर घडला. यात दुचाकीवरुन तीन संशयितांनी तुषारच्या दुचाकीचा पाठलाग केला. जवळपास एक ते दोन किलोमीटरचा पाठलाग करुन हल्ला चढवत तुषारला रक्तबंबाळ केले. काही मिनिटांत तुषारचा जागीच मृत्यू झाला. पोलिसांनी दिलेली माहिती नुसार, तुषार चौरे हा तरुण बोधले नगर येथील एका दुकानात कामाला आहे. दुचाकीवर ट्रीपल सीट आलेल्या तीन संशयितांनी चौरेच्या दुचाकीला लाथ मारली. दुचाकीहून पडल्याने संशयितांनी धारधार शस्त्राने हल्ला केला, यात चौरे गंभीर जखमी झाला. दुचाकीवरील चौरेचा मित्र पळून गेल्याने वाचला. रात्रीची वेळ असल्याने संशयितांची ओळख अद्याप पटलेली नाही. मात्र, हल्लेखोर चौरेच्या ओळखीतले असल्याचे आणि पूर्ववैमनस्यातून हल्ला झाला असण्याची शक्यता व्यक्त केली जात आहे.



## मोबाईलच्या व्यसनातून बाहेर येत अध्यात्माचा मार्ग जगण्याला दिशा देणारा - मंत्री भुसे

**नाशिक । प्रतिनिधी**

आज तरुणाई मोबाईलमध्ये व्यस्त, तर काही ठिकाणी व्यसनात अडकले असताना दुसऱ्या बाजूला भजन महोत्सव होत आहे. ही दरी आपण कमी केली पाहिजे, अध्यात्माचा मार्ग जगण्याला ऊर्जा देतो, भजन महोत्सव आयोजित करून नाशिककरांना एक चांगली मेजवानी दिल्याची भावना नाशिक जिल्हा पालकमंत्री दादाजी भुसे यांनी व्यक्त केली.

मंत्री भुसे यांनी सर्व शिवसैनिकांचे अभिनंदन करत, आपल्या हिंदू संस्कृतीत देवाची स्तुतिपर काव्यरचना साग्रसंगीत म्हणून देवाला भजणे किंवा आळविण्यासाठी आपण भजन म्हणत असतो. भजन हा योगसाधनेतील भक्तियोगाचा महत्वाचा भाग आहे, जगण्याला दिशा देण्याचे काम भजनाच्या माध्यमातून होत असल्याचे देखील मंत्री भुसे म्हणाले.

भजनी मंडळ समाजात परिवर्तनाचे काम करते, जनजागृतीचे कार्य करता यामुळे नाशिक शहराची 'क्वालिटी सिटी' म्हणून निवड झाली, त्यात आपले शहर क्वालिटी बनविण्यासाठी वारकऱ्यांसह भजनी मंडळाने स्वतःला झोकून द्यावे इतरांना देखील सांगावे असे आवाहन केले. नाशिक येथील रावसाहेब थोरात सभागृहात शिवसेना आयोजित भजन महोत्सवात मंत्री दादाजी भुसे बोलत होते. यावेळी शिवसेना जिल्हाप्रमुख अजय बोरस्ते, महानगर प्रमुख बंटी तिदमे, चंद्रकांत लवटे, सूर्यकांत लवटे, शाम साबळे आदी पदाधिकारी उपस्थित होते. भुसे म्हणाले की विदेशात देखील भजन परंपरेला मोठे स्थान आहे, परदेशात चिन्मयानंद मिशन तसेच हरेकृष्ण संप्रदायाचे अनुयायी भजनांचे कार्यक्रम आयोजित करत असतात. त्यामुळे भजनाला एक वेगळं ग्लॅमर आहे. शिवसेनेच्या माध्यमातून आजच्या या महोत्सवात ५० भजनी मंडळे सहभागी झालेत. ही कौतुकास्पद बाब आहे. भविष्यात देखील आपल्या माध्यमातून राज्यभरात काही भजनाचा कार्यक्रम घेता येईल का? याचा देखील आपण विचार करायला हवा असे मत यावेळी व्यक्त केले.

## तरुणांना बनवतोय व्यसनाधीन : गॅम्बलिंग गेमिंगमध्ये होतो आर्थिक गेम

हल्ली इंटरनेट, ऑनलाइनचा जमाना. सध्या लहानांपासून ते वयोवृद्धांपर्यंत मोबाइल आकर्षणाचा केंद्रबिंदू ठरत असून, याच्या अतिरिक्त वापराने तरुणाई बिघडत चाचली आहे. अशातच भर पडली ती, ऑनलाईन गेमची. शॉर्टकट पैसे कमाविण्याच्या नादात अक्षरशः तरुणांचा बळी जातोय, हे त्यांच्या लवकर लक्षात देखील येत नाही.

काही तरुण मुले पैसे कमविण्याच्या शॉर्टकट मार्ग म्हणून मोबाइलवर ऑनलाइन गेम खेळतात. नैराश्य, आर्थिक अडचणी, शिक्षणात व कुटुंबाच्या कामात वेळ देता न येणे, निद्रानाश आदी अडचणींचा सामना करावा लागत आहे. रम्मीसारखे गेम्स सुरुवातीला कुतूहल म्हणून खेळायला सुरु करणारे तरुण हळूहळू त्याच्या व्यसनाच्या आहारी जात आहेत. तहानभूक, काम सर्वकाही विसरून दिवसरात्र पैसे लाऊन ऑनलाईन खेळ खेळणे, यातच रममाण झाल्याचे पाहावयास मिळत आहे. सध्या मोठ्या प्रमाणात ऑनलाइन गेमच्या माध्यमातून 'काही तासातच लाखो रुपये कमवा करोडपती व्हा' अशी आमिषे दाखविणाऱ्या जाहिरात दिवसभरात सतत पाहायला मिळत आहेत. तरुणाई याकडे ओढली जात असून, कर्जबाजारी होत असल्याचे चित्र दिसत आहे. काही कर्जबाजारी तर काही यातील नैराश्यामुळे व्यसनाधीन झाले आहेत, तर काहींची झोप उडून त्यांना निद्रानाश जडला आहे. आजकालची काही तरुणाई कष्ट न करता ऑनलाइन गेमच्या माध्यमातून कसे आपण एका दिवसातच लखपती बनू या विचारात असतात. तरुणाई तर मोबाइल हाताळण्यात तरबेज आहे. दिवस रात्र मोबाइलच्या सानिध्यात घालवणाऱ्यांना आता ऑनलाइन गेमच्या माध्यमातून गुंतण्यात तरुणाईचे प्रमाण अधिकच आहे.

### गेमिंग ॲप्सचे मोहजाल

लोकांना गंडविण्यासाठी गुन्हेगार अनेक शक्कल लढवित आहेत. गेल्या काही दिवसांपासून ऑनलाईन गंडा घालण्याचे प्रकार वाढले आहेत. सेक्सटॉर्शन, हनी ट्रॅपचे रॅकेट तर सर्वश्रुत आहे. आता गुन्हेगारांची मजल यापुढे गेली आहे. सध्याच्या युवकांचा जास्तीत- जास्त वेळ मोबाईल आणि सोशल मीडियावर जात आहे, याचाच गैरफायदा काहीजण घेत आहेत. युवकांना मोहजालात अडकविण्यासाठी नवनवीन मोबाईल गेमिंग ॲप्स विकसित केली आहेत. हे ऑनलाईन गॅम्बलिंग गेमिंग, लोन ॲप्सचे मोहजाल तरुणाईवर फेकले जात आहे. यात अनेकजण अडकत चालले आहेत.



### ..... खेळा आणि पैसे जिंका

या गेमिंगमध्ये खेळा आणि पैसे जिंका, अशा प्रकारचे संदेश किंवा लिंक मोबाईलवर येतात. कॅश गेम, जंगली, सर्कल, पॅलेस अशा अनेक प्रकारांचा यात समावेश आहे. या ॲप्सचा प्रचार अभिनेते, क्रिकेटपटूव्दारे केला जातो. यातून काही दिवसांतच लाखोंची कमाई होऊ शकते, असे युवकांना भासविले जाते. पॉईंटस मिळवत चालल्याने यातून सुरुवातीला काही प्रमाणात कमाईही होते. पण नंतर हे व्यसन जडते. यामुळे युवक दिवस-रात्र, काळ-वेळ न पाहता पैसे लावून खेळण्यात दंग राहतात. हळूहळू रक्कम वाढत गेल्यानंतर मात्र जिंकण्याचे प्रमाण कमी आणि हरण्याचे प्रमाण जादा होते.



शोध बातमी

**पुरुषोत्तम पाटील**
मुख्य उपसंपादक
मो.७०५७०१११२६

## ग्रामपंचायत विस्ताराधिकारी जगदीश खाडे यांना मारहाण

**साक्री । प्रतिनिधी**

येथील पंचायत समितीच्या ग्रामपंचायत विभागातील विस्तार अधिकारी जगदीश पांडुरंग खाडे यांना आज दुपारी एकच्या सुमारास पंचायत समिती कार्यालयात सहाय्यक गटविकास अधिकाऱ्यांच्या दालनातच प्रवीण मुरलीधर बोरसे (रा. कावठे, ता. साक्री) यांनी मारहाण केली.

या प्रकरणी मारहाण तसेच शासकीय कामात अडथळा निर्माण केल्याने गुन्हा दाखल करण्यात आला असून, पोलिसांनी प्रवीण बोरसे यास ताब्यात घेतले आहे. नागपूर (व, ता. साक्री) येथील ग्रामपंचायत शिपाई अनिल बिरारीस यास कामावर हजर करून घ्या, असे सांगत, धमकावत शिवीगाळ करून श्री. खाडे यांना मारहाण करण्यात आली. या वेळी प्रवीण बोरसे हाही त्या ठिकाणी उपस्थित होता. श्री. बोरसे हे शिपाई पदावर नेमणुकीस असलेल्या अनिल बिरारीस यांच्या निलंबनाबाबत विचारणा करीत त्यांना कामावर हजर करून घ्या, असे सांगत धमकावत होते. श्री. खाडे यांनी सदर प्रकरण न्यायप्रविष्ट असल्याचे सांगत त्यांची समजूत काढण्याचा प्रयत्न केला, मात्र श्री. बोरसे यांनी संतापात उठून शर्ट कॉलर पकडून शिवीगाळ करीत त्यांना बुक्क्यांनी मारहाण करीत शासकीय कामात अडथळा आणला.

## ईर्शाळवाडीची काळरात्र

माळीणच्या दुर्घटनेनंतर आता अलीकडेच त्या गावाचे पुनर्वसन झाले. अशा दुर्घटना टाळण्यासाठी ठाम उपाययोजना तातडीने करण्याची गरज आहे.

रायगड जिल्ह्यातील इर्शाळगडाच्या पायथ्याशी असलेल्या ईर्शाळवाडीवर बुधवारी रात्री दरड नव्हे, दुःखाचा डोंगरच कोसळला! गेल्या तीन दिवसांपासून कोकणात पडत असलेल्या मुसळधार पावसामुळे या छोट्याशा जेमतेम अडीचशे-तीनशे वस्ती असलेल्या गावातील चाळीस-पन्नास घरे डोंगराचा मोठा भाग कोसळून अक्षरशः जमीनदोस्त झाली. वीस-बावीस जणांचे बळी आणि अद्याप काही बेपत्ता असलेल्यांचे जीवन संपवणारी बुधवारची रात्र काळरात्र ठरली! घटनेची माहिती कळताच मुख्यमंत्री एकनाथ शिंदे आणि अन्य काही मंत्र्यांनी घटनास्थळी धाव घेतली. पनवेलमधील निसर्गमित्रांची संघटना, परिसरातील लोकांनी दिवसभर बचाव कार्यात मोलाची मदत केली. प्रचंड पाऊस आणि या गावाची भौगोलिक रचना यामुळे यंत्राची मदत घेणे अशक्य ठरले. त्यातच पावसामुळे प्रचंड चिखलातून ढिगार्‍याखाली अडकलेल्यांना बाहेर काढणेही दुरापास्त झाले. तरीही अनेकांचा बचाव करण्यात यश आले. ज्या ईर्शाळवाडीत ही दुर्घटना घडली ती भारतीय भूवैज्ञानिक सर्वेक्षण विभागाच्या अहवालानुसार दरडप्रवण ठिकाणांच्या यादीत नसल्याची माहिती विधानसभेत देण्यात आली. ईर्शाळवाडीच्या या दुर्घटनेने नऊ वर्षांपूर्वीच्या पुणे जिल्ह्यातील माळीण दुर्घटनेची आठवण झाली. तेथेही काही क्षणात संपूर्ण गावच काळाच्या उदरात गडप झाले. अशा प्रकारच्या घटना इतरत्रही घडल्या आहेत. अशा घटना जेव्हा घडतात तेव्हा अशा सह्याद्रीच्या घाटमाथ्यावरील धोकादायक गावांचे पुनर्वसन करण्याच्या घोषणा होतात; पण त्यासही प्रचंड विलंब लागतो. अशा दुर्घटनाग्रस्त भागातील लोकांचे स्थलांतर आणि पुनर्वसनाकडे फारसे गांभीर्याने पाहिले जात नाही. त्यातून अशा दुर्घटना घडतात. घाटमाथ्यावरील उत्खनन आणि पर्यावरणाचा असमतोल यामुळे अशा घटना घडतात हे माधव गाडगीळ समितीच्या अहवालातून पुढे येऊनही त्याबाबत गांभीर्य दाखवले गेले नाही. जून-जुलैमध्ये अशा घटना घडतात, याचे कारण पावसामुळे पाणी मुरून दरडी कोसळतात आणि त्यातून प्रचंड वित्त आणि जीवितहानी होते.

पर्यावरण रक्षणाची गरज

या आधीही अशा दुर्घटना घडल्या. महाड तालुक्यातील तळीये गावात दरड कोसळून ८४ जणांचा मृत्यू झाला. याच महाड तालुक्यातील जुई गावावर २००५ मध्ये दरड कोसळून जवळपास संपूर्ण गाव दरडीखाली गाडले गेले. त्यातही ९० हून अधिक जणांचा मृत्यू झाला होता. कोकणात अशा घटना विशेषत्वाने घडतात. याचे कारण हा डोंगराळ प्रदेश आहे. तेथे अतिवृष्टी होते. काही परिसर भूकंपप्रवण क्षेत्रात मोडतो. कोकणातील बहुतेक रस्ते घाटमाथ्यावरून जातात. या रस्त्यांसाठी डोंगर पोखरले जातात. त्यामुळे सैल झालेले डोंगर आणि दरडी कोसळण्यास सुरुवात होते. डोंगरमाथ्यावरील वाड्या वस्त्या आणि लोकवस्तीचा विस्तार यामुळे या परिसरात मोठ्या प्रमाणावर उत्खनन झाले. त्याचाही परिणाम कालांतराने दरडी कोसळण्यावर होतो. अतिवृष्टीमुळे खडकामधील सछिद्र पृष्ठभागाला तडे जातात, त्यातून नवे झरे निर्माण होतात. अतिवृष्टीमध्ये तड्यापासून दरडी कोसळतात. डोंगरभागातील उत्खनन, सपाटीकरण, वृक्षलागवड यामुळे पर्यावरणाचा र्‍हास होतो तो टाळणे आवश्यक ठरते. पर्यावरणतज्ज्ञ माधव गाडगीळ यांनी या दुर्घटनेवर बोलताना अयोग्य पद्धतीने बांधलेले रस्ते, बेकायदा दगडखाणी अशी कारणे सांगितली आहेत. ईर्शाळवाडी भागातील पर्यावरणात मोठ्या प्रमाणात झालेला मानवी हस्तक्षेप, हेही त्यामागील कारण आहे. गाडगीळ समितीने २०११ मध्ये केंद्र सरकारला दिलेला पश्चिम घाटविषयक अहवाल सरकारने अद्याप स्वीकारलेला नाही. विकासाच्या नावाखाली पर्यावरणालाच नख लावले जात आहे. पश्चिम घाट संवर्धनाबाबत गाडगीळ समितीच्या शिफारशीची अंमलबजावणी झाली असती, तर अशा दुर्घटना टळल्या असत्या. अशा घटना घडल्यानंतर हळहळ व्यक्त करण्यापेक्षा पर्यावरणाच्या रक्षणाची खबरदारी घेतली गेली, तर ते अधिक हिताचे ठरेल.

# कसोटी मानवता व्यवस्थापनाची

आपण दैनंदिन जीवनात वर्तमानपत्र, प्रसारमाध्यमांतून, प्रत्यक्षपणे हृदय पिळवटून टाकणा-या घटना वाचत, ऐकत, पाहत असतो. मात्र अशा घटनांची पुनरावृत्ती होऊ नये म्हणून वैयक्तिक पातळीवर खरंच सतर्कता बाळगतो का? हा आत्मचिंतनाचा विषय आहे. कारण घटना दुसऱ्यांसोबत घडलेली आहे. जोपर्यंत त्याची झळ आपल्याला लागत नाही तोपर्यंत त्याला गांभीर्याने न घेणे ही मानवी प्रवृत्ती वाढीस लागलेली आहे. सर्वसामान्यांपासून लोकप्रतिनिधी, प्रशासकीय यंत्रणा यांचा यात समावेश होतो.



आम्ही स्वातंत्र्याचा अमृत महोत्सव जल्लोषात साजरा केला म्हणून स्वतःची पाठ थोपटून घेताना स्वातंत्र्याचा शताब्दी महोत्सव निर्भयपणे अनुभवण्यासाठी नवीन पिढीला गुणवत्तेची भेट देणार आहोत का? त्यांचे ध्येय गाठण्यासाठी नेतृत्वगुण व व्यवस्थापन कौशल्य याची कसोटी लागणार. त्यासाठी शिस्त स्वयंप्रेरित हवी. गुणवत्ता ही काही लाट नाही, आली आणि गेली. गुणवत्ता ही सर्वत्र लागू पडणारी संकल्पना आहे. वस्तुस्थितीमध्ये सतत सुधार घडवून आणण्यासाठी निरंतर सतर्क राहणे अपरिहार्य आहे. त्यामध्ये व्यक्ती, सेवा, संस्था यांचा विचार केल्यास गुणवत्तेचे अस्तित्व किंवा तिचा अभाव सहज लक्षात येतो. गुणवत्ता ही व्यक्तिनिष्ठ असते. त्यासाठी मानवी संसाधनांचा विकास, तणावमुक्त वातावरण, समस्यांचे पद्धतशीर निरसन होणे आवश्यक आहे.

निव्वळ घोषणा या व्यक्ती-व्यक्तींमधील संबंधात क्लिष्टता निर्माण करतात. लोकप्रतिनिधींनी याचा दूरगामी विचार करून त्यांची बांधिलकी लक्षात घेतली पाहिजे; परंतु आधुनिक भारताचे लोकप्रतिनिधी सत्तेसाठी केव्हा एकमेकांचा गळा पकडतील आणि केव्हा गळाभेट घेतील, याची शाश्वती नाही. त्यामुळे प्रशासकीय यंत्रणातील व्यक्तींनाही मनमानी कारभार करण्यासाठी रान मोकळे झालेले आहे. त्यामध्ये शोषण होत आहे. यांच्या पायाशी निर्बुद्धपणे स्वाभिमान गहाण ठेवणाऱ्या त्यांच्यामागे वाहवत जाणाऱ्या जनतेचे.

मणिपूर राज्यात मागील दोन महिन्यांपासून अधिक काळ हिंसाचारात होरपळणारी संतापजनक आणि मानवतेला अत्यंत लाजिरवाणी महिलांना विवस्त्र करणारी घटना. तीन वर्षांपूर्वी महाड येथील तळीये वाडीत घडली, त्याच घटनेची पुनरावृत्ती खालापूर येथील इर्शाळवाडीतील दरड कोसळण्याची घटना, दक्षिण गोव्यात सापडलेल्या खाणीतील दगड फोडण्यासाठी मनाई असलेल्या स्फोटकांची घटना, अमली पदार्थ तस्करीचे वाढते प्रमाण व युवा पिढीकडून सेवन, धरण क्षेत्रातील अतिवृष्टीच्या घटना, अंबरनाथ लोकल प्रवासातील ४ महिन्यांचे बाळ नाल्यात पडून वाहून गेल्याची घटना, अपघातात मरणाऱ्याच्या वारसाला सरकार नुकसान भरपाई देते म्हणून मुलाच्या कॉलेजची फी भरण्यासाठी तामिळनाडूमध्ये बससमोर उडी घेणारी माऊली, उच्चभ्रू इमारतीत आग लागलेली असताना ती विझवताना अग्निशमन दलाच्या कार्यात अडथळे येणार नाहीत, याची दक्षता न घेता त्याचे चित्रीकरण करण्यात मग्न होऊन त्या गर्दीत स्वतः च्या लहान मुलांना मोकळे सोडणारे पालक, स्टेअर केस आणि रिफ्यूजी एरियाच्या जागेचा उपयोग कपडे सुकवण्यासाठी करणे अशा कित्येक घटना सांगतात आपत्ती या मानव निर्मितच आहेत.

प्रशासकीय यंत्रणातील कामचुकार भ्रष्ट व्यक्तींसोबत नियमांचे पालन न करणारी जनताही तितकीच जबाबदार आहे. त्यासाठी मोफत चित्रपट दाखविण्यात चढाओढ करण्यापेक्षा आत्मसन्मान, आत्मविश्वास व धैर्य वाढीसाठी परिस्थिती व्यवस्थापन कौशल्य प्रशिक्षण देणे महत्त्वाचे आहे. स्थानिक लोकप्रतिनिधी आणि त्यांच्या कार्यकर्त्यांनी उत्सवांचे इव्हेंट करण्यापेक्षा आपल्या विभागातील नागरिक सुरक्षित आणि सुखसोयीयुक्त जीवन जगण्यासाठी विविध कौशल्य प्राप्त करून समाज आणि परिसर आदर्श कसा करू शकतो, यावर जातीभेदाचे राजकारण न करता कृतिशील राहणे महत्त्वाचे आहे. लोककल्याण आणि सुरक्षिततेची जबाबदारी केवळ शास्त्रज्ञ, शेतकरी, सैनिक यांची नसून केवळ एक दिवस राष्ट्रप्रेम आणि बाकी दिवस मनोरंजन हे चित्र बदलण्यासाठी संविधानाने अधिकार दिलेल्या प्रत्येक नागरिकाची जबाबदारी आहे. त्यासाठी लोकशाहीत संस्कारक्षम, अभ्यासू, जनसेवेची तळमळ असलेले आणि निःस्वार्थी भावनेने समाजाचे प्रतिनिधित्व करण्यासाठी इच्छूक असलेले प्रतिनिधी मतदारांनी आपल्या पवित्र मतदानाद्वारे निवडले तर आजच्यासारखी राजकीय परिस्थिती निर्माण होणार नाही. मतदाराला आणि प्रामाणिक कार्यकर्त्यांना लोकशाही मूल्य जपण्यासाठी प्रतिभा संपन्न लोकप्रतिनिधी ओळखता आले पाहिजेत. जनता एकत्र नसल्याने जनतेच्या प्रश्नांचे भांडवल करून स्वतःच्या कुटुंबाचाच विकास साधणारे राजकीय पुढारी मनमानी पद्धतीने लोकशाहीची विटंबना करत आहेत. कटकारस्थानात व्यस्त असलेल्या दुर्योधनांकडून लोकशाहीचे वस्त्रहरण थांबवायचे असल्यास सुदर्शन चक्रधारी श्रीकृष्ण प्रत्येक घरात निर्माण झाले पाहिजेत.

जनतेचा व्यवस्थापनातील सहभाग आदी कार्यक्रमांनी स्वयंशिस्त कशी निर्माण होते, यावर लक्ष केंद्रित होणे महत्त्वाचे आहे. जिथे कुठे गर्दी असेल तिथे शिस्तीच्या पालनाची आवश्यकता असते. शिस्तीचे पालन न झाल्यास बेबंदपणा निर्माण होऊन कार्यात अवरोध निर्माण होतो. ज्यांच्यात जबाबदारीची जाणीव कमी असते, मनावर नियंत्रण ठेवण्याची क्षमता कमी असते, त्यामुळे वेगाने अधोगतीने धाव घेणाऱ्या मनप्रवृत्तीस रोखण्यास सुसंस्कार व योग्य नियंत्रणाची आवश्यकता आहे. संविधानाने घालून दिलेल्या नियमांचे तंतोतंत पालन करणे म्हणजे शिस्त होय. हे नियम तयार करताना देशातील वातावरण चांगले राहील व व्यवस्थापनात अडचणी येणार नाहीत, याचा विचार केलेला आहे. अंतर्बाह्य शिस्तपालन होणे हे व्यवस्थापनाचे अंतिम लक्ष असायला हवे. स्वयंप्रेरित शिस्त एका दिवसात निर्माण होत नाही. नागरिकांमध्ये सदसदविवेकास जागृत करूनच हे काम होऊ शकते. शिस्तीच्या विभिन्न नियमांच्या कार्यकारणभावाची चर्चा करून नियमांचे महत्त्व पटवून द्यावयास हवे. गुन्ह्याच्या किंवा नियम भंगाच्या प्रमाणात शिक्षा असावी. ऊठसूठ आर्थिक दंड करणे या शिक्षा योग्य ठरत नाहीत. नियमांचे पालन करण्याची प्रवृत्ती निर्माण होणे महत्त्वाचे आहे.

समाजकल्याण तसेच महिला व बाल विकास विभागाच्या माध्यमातून क्रीडा, वैद्यकीय तपासणी, व्यावसायिक मार्गदर्शन, कला, विज्ञान छंद गृहे, स्वसंरक्षण प्रशिक्षण, शाळा-महाविद्यालयातील सुरक्षा, स्वच्छतागृह, वसतिगृह, पटांगणे, बस सेवा, वाहन स्थानक यांची सुविधा सर्व स्तरावर पुरविणे महत्त्वाचे आहे. त्याचबरोबर फुकटेपणाच्या प्रवृत्तीची जोपासना नको. तरुणांना समाजाचे व त्यात घडणाऱ्या विविध घडामोडींचे निरीक्षण म्हणून नेतृत्व पल्लवित करण्याची व त्याला समाजोपयोगी, राष्ट्रोपयोगी आकार देण्याची विशेष आवश्यकता आहे. मित्रपरिवारामुळे त्यांच्यात काही दोष शिरलेले असतात. ज्यांची बौद्धिक विकास आणि क्षमता शालेय विषय ग्रहण करण्याची नसते किंवा त्यांना शालेय शिक्षणात अभिरूची नसते त्यांचा विविध मार्गांनी शोध घेऊन मार्गदर्शन करण्याची आवश्यकता आहे. त्यासाठी प्रशिक्षित समाजसेवक, विषयाचे तज्ज्ञ मार्गदर्शन करून विकास घडवून आणू शकतील. जेणेकरून ते समाजाला त्रासदायक ठरू शकणार नाहीत. इतरांकडून आपली फसगत होऊ नये व जगातील विविध क्षेत्रातील ज्ञान आपणास असावे, असे वाटते. अशा लोकांना आवश्यक ते ज्ञान देऊन समाजाचा उपयुक्त घटक होण्याकरिता समाजशिक्षण योजना राबविल्या पाहिजेत.

देशातील नागरिकांचे मनस्वास्थ्य सांभाळता आले पाहिजे. मनाचे आरोग्य म्हणजे कोणत्याही घटनेने एकदम उत्तेजित व हतोत्साहित न होण्याची वृत्ती, कोणत्याही घटनेचा शांतपणे कार्यकारणभाव शोधून परिस्थितीला योग्य वळण देण्यासाठी कार्ययोजना तयार करण्याची प्रवृत्ती निर्माण होणे आवश्यक आहे. नागरिकांनी वेळेचे कारण न देता नैतिक जबाबदारी म्हणून प्रशिक्षणास प्राधान्याने प्रतिसाद दिलाच पाहिजे. प्रत्येकाचे शारीरिक व मानसिक आरोग्य चांगले राहावे व त्यात निर्माण होणारे छोटे दोष त्वरित दूर करता यावेत याकरिता सर्व पातळीवर अनुपदेशनाची व्यवस्था केल्यास मानवतेचे व्यवस्थापन करणे सोपे जाईल. जयहिंद !

**- सुरक्षा घोसाळकर, पवई, मुंबई**

# चला झाडे लावू या...

झाडे ही आपली जीवन संजीवनी आहे. सजीवांना जगण्यासाठी ऑक्सिजन वायू देऊन त्यांनी सोडलेला कार्बन डायऑक्साईड शोषून घेतात. त्यासाठी झाडांची संख्या वाढली पाहिजे. झाडे ही पर्यावरण स्वच्छ ठेवण्यास महत्त्वाची भूमिका बजावीत असतात. त्यामुळे आपल्याला शुद्ध हवा मिळते. त्यासाठी प्रत्येक वर्षी पावसाळ्यात झाडे लावलीच पाहिजेत.

कोकणामध्ये विकासाच्या नावाखाली जंगल तोड होताना दिसत आहे, तर काही ठिकाणी डोंगर सपाट करून गगनचुंबी इमारती उभ्या होत आहेत. अशावेळी कोकणचे निसर्गरम्य सौंदर्य टिकून ठेवण्यासाठी दरवर्षी नवीन झाडे लावू या. कोकणाला जन्मतः निसर्गाचे विनामूल्य वरदान लाभले आहे. त्याचे संगोपन करणे प्रत्येक कोकणवासीयांचे कर्तव्य आहे. केवळ पर्यावरण दिवशी 'झाडे लावा देश वाचवा' किंवा 'झाडे लावा झाडे जगवा' अशी घोषणाबाजी करत बसण्यापेक्षा आता सर्वांची जबाबदारी आहे ती म्हणजे आपल्या परिसरात झाडे लावण्याची.

उन्हाळ्यात जेव्हा उष्णतेत वाढ होते तेव्हा झाडांची प्रत्येकाला आठवण होत असते. मात्र पाऊस पडायला लागला की, सर्वजण आठवणी विसरून जातात. तेव्हा नैसर्गिक संतुलन राखण्यासाठी प्रत्येकांने आपल्या परिसरात झाडे लावावीत. ती सुद्धा नर्सरीमधील न घेता मोफत उगवणारी. जंगलामध्ये जी झाडे आहेत ती लावलेली नाहीत, तर उगवलेली झाडे आहेत. तिचे कोणत्याही प्रकारे संगोपन केलेले नसते. निसर्गानेच दिलेली विनामूल्य ही देणगी आहे. उलट विकासाच्या नावाखाली सध्या जंगलतोड होताना दिसत आहे. अशावेळी झाडे लावायला हवीत. आता मोफत कोणती झाडे उगवतात, याविषयी अधिक माहिती घेऊ.


बऱ्याचवेळा आपण आंबे, फणस, जांभळे इत्यादी खाऊन त्याच्या बिया आपल्या घराच्या शेजारी असलेल्या उकिरड्यावर टाकतो. पाऊस लागल्यावर त्याला कोंब येतात. त्यानंतर ती झाडे वाढू लागतात. ती झाडे मुळासकट कुपळून आपल्या परिसरात लावावीत. यासाठी कोणत्याही प्रकारे झाडांची लागवड करण्याची किंवा विकत घेण्याची गरज नसते. फक्त ज्याठिकाणी पडीत जागा असेल, अथवा आपल्या घराच्या परिसरात जी झाडे वाढलेली असतील ती झाडे कुपळून मोकळ्या जागेत, खड्डे खणून त्यात झाडे लावावीत. यात दुहेरी फायदा होऊ शकतो. फळे पण मिळतात आणि पर्यावरण संतुलनही राखता येते.

मागील दहा ते पंधरा वर्षांपूर्वीचा आढावा घेतल्यास राज्यात उन्हाळात सुद्धा अवकाळी पावसाने अधूनमधून हजेरी लावली होती. त्यात राज्यातील नागरिकांना उष्माघाताने आपल्या जीवाला मुकावे लागले होते. काही ठिकाणी सेवकांचा उष्माघाताने मृत्यू झाला. याची राज्यातील नागरिकांना कल्पना आहे. त्यानंतर जरी रुपये पाच लाखांची शासकीय मदत जाहीर झाली, तरी घरातील व्यक्तीचे यामध्ये हकनाक निधन झाले. याला जबाबदार कोण? नंतर कदाचित हे पण नैसगिक संकट म्हणून जाहीर केले जाईल. यात निरपराध नागरिकांना आपल्या जीवाला मुकावे लागले हे मात्र निश्चित. आता पावसाळा ऋतू चालू असून पावसाला सुरुवात झाली आहे. ती सुद्धा संततधार.

उन्हाळ्यातील परिस्थितीचा विचार करून राज्यातील सुजाण नागरिकांनी न विसरता आपल्या परिसरात झाडे लावावीत. तेव्हा प्रत्येकांने उन्हाळ्यातील उकाड्याला आळा घालण्यासाठी झाडांची लागवड करणे आवश्यक आहे. महत्त्वाची बाब म्हणजे प्रत्येक ग्रामपंचायतीने सुद्धा उन्हाळ्यातील ग्रामसभा पाण्याच्या प्रश्नावर वादळी झाल्याने आपल्या ग्रामपंचायतीच्या अखत्यारीत येणाऱ्या प्रभागामध्ये ज्याठिकाणी मोकळी जागा असेल किंवा पडीत मळे असतील, अशा सपाट जागेचे सर्वे करून त्याठिकाणी कोणत्या झाडांची लागवड करू शकतो, तसेच किती झाडे लावू शकतात याचा आराखडा तयार करून तशाप्रकारे जवळ असलेल्या नर्सरीमध्ये जाऊन योग्य ती प्रक्रिया करून झाडे लावण्यात यावीत, असे दरवर्षी करणे गरजेचे आहे.

**- रवींद्र तांबे**

## शब्दकोडे-१२९



आडवे शब्द

१. उन्हाळ्यात दिलासा देणारा पाऊस ३. चामखीळ ४. पराजय ७. कौसल्यापुत्र ९. कर्ज देणारा १०. नवरदेवाकडील मंडळी १२. पंख १३. कपडालत्ता १६. तापविणारा सूर्य १८. गुजराथी नृत्यप्रकार १९. झोपडी २०. भांडण २१. बारा स्वारांच्या अक्षरांची मालिका उदा.क, का, की, कि, कु, कू, इत्यादी २३. चप्पल २४. लवकर, वेगाने २६. ख्रिश्चन धर्माचे प्रमुख धर्मगुरु २७. बारा वर्षाचा काळ २९. कोर्टातील कथन ३०. गीत, नृत्य, वाद्य यांचा संगम ३२. नवरा (ग्रा.) ३५. रमणीय ३६. धुंदी ३८. ज्ञानेश्वरीत उल्लेखलेला एक पक्षी ४०. श्रीमंत ४१. एक क्षार ४२. रस काढण्याचे यंत्र ४४. चिंतन ४५. अंतःकरण ४६. तेज ४८. मध्यभागी ५०. प्रत्येक दिवशी ५२. वांग्याचा खमंग पदार्थ ५३. गुरांचा समुदाय ५४. मऊ ५६. कौरव पांडवांची कथा ५८. पुरुष, शूर पुरुष ५९. समीक्षा ६२. मदनपत्नी ६३. कपटी ६८. एक पालेभाजी ६९. परमेश्वर ७०. चिंता ७२. मिठी ७३. एकदम पडलेला शेणाचा गोळा ७४. अजागळ ७६. आशीर्वाद ७९. एकत्रित रडणे ८०. सुगंध ८१. बारावी रास ८२. तानाजीला दिलेली पदवी, शूर पुरुष

उभे शब्द

१. व्यर्थ बडबड, चऱ्हाट २. लग्नासाठी जमलेले गणगोत ३. अखिल भारतीय म राठी साहित्य संमेलन घेणारी संस्था (फक्त आद्याक्षरे) ३अ. फुरसत ४. पुन्हा पुन्हा ५. घर ६. आशीर्वाद ७. असुर ८. नाम शेष ९. सर्प ११. दुसऱ्याकडे भोजन घेणे, व्रतकाळात हे पाप समजतात १२. अनुमती १४. वाढलेला व्याप १५. वही १७. सोंगट्यांचे वस्त्र १९. झीज, नुकसान २०. पोते २१. दावा २३. हेलपाटा २५. पृथ्वी २६. कुबड २८. घागरा ३०. एकत्र गोळा करणे, जमविणे ३१. श्रीविष्णूचे नावडते फ ूल ३३. दशमुखी रावण ३४. चाक ३७. एक हिंस्त्र पक्षी ३८. झोंबणारे ३९. लिहिलेले वाचणारा ४०. सन्मानाची रक्कम ४३. पंकज ४४. माझे ४५. इच्छा ४७. अभिप्राय ४९. हत्यारांची, सामानाची पिशवी बहुदा न्हाव्याकडील ५०. इटलीची राजधानी ५१. लोखंड (हिंदी) ५२. ओहोटीच्या विरुद्ध ५३. पाषणहृदयी ५५. रसदार ५६. दुसऱ्याच्या मनातील भाव ओळखणारा ५७. हिंदुस्थान ५८. मौज ६०. फणसाचा एक प्रकार ६१. नागपूरचे प्रसिद्ध फळ ६३. गाजावाजा ६४. तोटी ६६. खिडकीची काच ६७. यावर्षी ६८. नोकर ७१. आयुष्य ७५. पुरे! ७७. मादीच्या विरुद्ध ७८. धातूचा जाड-बारीक धागा

## शब्दकोडे १२८ चे उत्तर

**आडवे उत्तर**

१.आर.आर. पाटील
६.फौजदार ९.तंगडी ११.क्षत
१२.हारजीत १४.सनगर १६.घण
१७.विलोभनीय १९.नस २१.मज
२४.टर २५.तन २७.रमराट
२९.दामोदर ३१.धाक ३२.बदन
३३.रवरव ३५.सराईत ३७.जयद्रथ
३९.लाभ ४०.खर्व ४१.शरम
४३.रसवान ४५.नागर ४६.राबता
४८.वहाण ४९.लवकुश ५१.चर
५३.सजन ५४.गदा ५५.भारवाहक
५७.कस ५९.जबाबदारी
६१.पसरणी ६२.जलतरण
६४.पात ६५.घर ६६.मतदार
६८.आयकर ६९.पळपुटा
७०.घरंदाज ७२.माहितगार
७५.पदर ७७.रास ७९.शीरा
८०.वतनदार ८१.गेला बाजार

**उभे उत्तर**

१.रक्षण ३.आत ४.पाणलोट
५.लहानी ६.फौजी ७.जतन
८.रस ९.तंग १०.गरम १३.रयत
१५.नजरानजर १६.धनदाट
१८.भरधाव २०.सरबत
२२.जनपथ २३.उदरभरण
२६.नवरा २८.मद ३०.रव
३४.रखवालदारी ३५.सर्वनाश
३६.ईश्वरचरणी ३८.यमराज
४१.शक्य ४२.नवरोज ४४.नव
४७.बनकर ५०.कुरापत
५२.रवा ५३.सकल ५४.गदाधर
५५.भारतीय ५६.हजर
५८.सणवार ६०.बाबत
६३.तजवीज ६४.पातळ
६५.घरघर ६६.मधमाशी
६७.दानत ६८.आटा ६९.परत
७१.दादला ७३.हिरा ७४.गाव
७६.दगा ७७.राजा ७८.सर

हे मराठी दैनिक मालक **विजय आत्माराम ठाकरे** यांनी मुद्रक-प्रकाशक-संपादक- चंद्रशेखर आत्माराम पाटील यांच्या पार्वती प्रिंटर्स-२, ई ११५/३, एम.आय.डी.सी., अवधान, धुळे (एम-५) येथे छापून, लक्ष महाराष्ट्र कार्यालय, बॉम्बे लॉज बिल्डींग, पहिला मजला, आग्रारोड धुळे येथून प्रकाशित केले.
**'लक्ष महाराष्ट्र' नाशिक कार्यालय** - फ्लॅट नं.१०, गंगा अपार्टमेंट, बोहरा पार्क, गंगापूर रोड, नाशिक-४२२००२ **मध्यवर्ती कार्यालय-** बॉम्बे लॉज बिल्डींग, दौलत म्युझिक सेंटरच्यावरती, पहिला मजला, आग्रारोड, धुळे. मो.९६६४३२५५५५ फोन नं. ०२५६२-३५६५७४.
**नंदुरबार कार्यालय** - शॉप नं. ११/१२, संत दगा महाराज कॉम्प्लेक्स, कोरीट नाका, नंदुरबार. **जळगाव कार्यालय** - बी विंग, रुम नं. ११ तिसरा मजला, गोलाणी मार्केट, जळगाव. E-mail: lakshamaha.dhule@gmail.com. (RNI No.MAHMAR/2019/79184)

**न्यूज कॉलम**

### दूषित पाणीपुरवठ्याने नागरिक त्रस्त

**नाशिक ।** जेलरोड परिसरात चेहडी बंधाऱ्यातून दूषित पाणीपुरवठा होत असल्याने नागरिकांना विविध आजारांचा सामना करावा लागत आहे, तर दुसरीकडे गोदावरी जलकुंभाला पुरवठा करणारी ९०० मिलिमीटरची जलवाहिनी नादुरुस्त असल्याने कमी दाबाने पाणीपुरवठा होत असल्याने नागरिक संतप्त झाले आहेत. चार दिवसांत शुद्ध आणि पुरेशा दाबाने पाणीपुरवठा न केल्यास महापालिकेसमोर आंदोलन करण्यात येईल, असा इशारा शिवसेनेने पालिका प्रभारी प्रशासक भाग्यश्री बानायत यांना निवेदनाद्वारे दिला आहे. नाशिकरोड जलशुद्धीकरण केंद्राला पाणीपुरवठा करणाऱ्या ९०० मिलिमीटर जलवाहिनीच्या दुरुस्तीचे काम ठप्प झाले आहे. हे काम त्वरित सुरू करून नागरिकांना पिण्यासाठी पाणी उपलब्ध करून द्यावे. बानायत यांनी पाणीपुरवठा सुरळीत करण्याचे आश्वासन दिले आहे.

# विधानसभा मतदारसंघातील आरोग्यवर्धिनी केंद्रांबाबत आ. फरांदे यांची बैठक

**नाशिक । प्रतिनिधी**



नाशिक महापालिका क्षेत्रांतर्गत नाशिक मध्य विधानसभा मतदारसंघातील आरोग्यवर्धिनी केंद्रांसंदर्भात नाशिक महापालिकेच्या आयुक्त भाग्यश्री बानाईत यांच्या उपस्थितीत बैठक घेण्यात आली. यावेळी नाशिक मध्य विधानसभा मतदारसंघातील विविध प्रभागातील माजी नगरसेवक देखील उपस्थित होते.

पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी राज्यातील गोरगरीब जनतेला आरोग्य सुविधा उपलब्ध व्हावी यासाठी आरोग्यवर्धिनी केंद्र स्थापन करण्याची योजना तयार केलेली आहे. केंद्रीयमंत्री डॉ.भारती पवार यांच्या पाठपुराव्यामुळे नाशिक महापालिकेअंतर्गत १०६ ठिकाणी आरोग्यवर्धिनी केंद्रांना मान्यता मिळालेली आहे. या केंद्राच्या माध्यमातून विविध ठिकाणी ओपीडी तयार करण्यात येऊन गोरगरिबांच्या छोट्या-मोठ्या आजारांचा उपचार केला जाणार आहे. यासाठी औषधे देखील शासनाकडून उपलब्ध करून दिली जाणार आहे. नाशिक मध्य विधानसभा मतदारसंघात मंजूर करण्यात आलेल्या २१ केंद्रांसाठी विविध प्रभागांमधील नाशिक मनपाच्या वास्तू उपलब्ध करून देण्यात आल्या आहेत.

तसेच काझी गढीच्या बाबत देखील या बैठकीत चर्चा करणे करण्यात आली. या ठिकाणी कोणतीही दुर्घटना घडू नये यासाठी येथील नागरिकांचे पुनर्वसन करण्यात यावे अशी मागणी आ. देवयानी फरांदे यांनी केली. नागरिकांचे पुनर्वसन करताना त्यांना योग्य सोयी सुविधा उपलब्ध होतील याकडे प्रशासनाने लक्ष द्यावे अशी विनंती देखील आ. फरांदे यांनी केली. तसेच काझी गढीच्या नागरिकांचा प्रश्न कायमस्वरूपी संपवण्यासाठी गढीला संरक्षण भिंत करण्याची मागणी आ. फरांदे यांनी केली. मनपा आयुक्त भाग्यश्री बानाईत यांनी याबाबत तत्काळ कारवाई करण्याचे आदेश प्रशासनाला दिले आहेत. यावेळी आमदार देवयानी फरांदे यांच्या समवेत माजी नगरसेविका स्वाती भामरे, दिपाली कुलकर्णी, अर्चना थोरात, श्याम बडोदे, सचिन कुलकर्णी, मिलिंद भालेराव, संध्या कुलकर्णी, अमोल गांगुर्डे, चित्रेश वस्पटे, विनोद येवलेकर, प्रतीक शुक्ल, संगीता जाधव आदींसह मान्यवर उपस्थित होते.



# स्वयंप्रेरणा चित्रप्रदर्शन प्रेरणादायी : नीलिमाताई पवार


**नाशिक । प्रतिनिधी**

करणने आपल्या कलेचा छंद जिवंत ठेवला. त्याने सातत्याने चित्रे रंगवून चित्रकलेत प्राविण्य मिळवले. त्याच्या पहिल्याच चित्रप्रदर्शनात याचा प्रत्यय येतो. त्याचा हा प्रयत्न इतर युवकांसाठी प्रेरणादायी आहे. असे प्रतिपादन मविप्रच्या माजी सरचिटणीस नीलिमाताई पवार यांनी केले. स्वयंप्रेरणा चित्रप्रदर्शनाच्या उदघाट्नप्रसंगी त्या बोलत होत्या.

चित्रकलेचे कोणतेही शास्त्रशुद्ध प्रशिक्षण न घेता करण धोंडगे या युवकाने स्वयंप्रेरणेने कलासाधना सुरु ठेवली. कृषी अभ्यासक्रम शिकताना तो आपला छंद जपतो आहे. त्याचे पहिलेच 'स्वयंप्रेरणा' हे चित्रप्रदर्शन नाशिकरोडच्या पीएनजी कलादालनात भरविण्यात आले आहे. करण धोंडगे सध्या नाशिकच्या कर्मयोगी दुलाजी सीताराम पाटील कृषीमहाविद्यालयात बीएससी ॲग्रीकल्चरच्या तिसऱ्या वर्गात शिकत आहे. तो सातत्याने चित्रे रंगविण्यात रमून जातो. त्याचे स्वयंप्रेरणा चित्रप्रदर्शन नाशिकरोडला पासपोर्ट ऑफिस शेजारी पु.ना. गाडगीळ कलादालनात दि. ३० जुलै पर्यंत दररोज सुरु राहील. सकाळी ११ ते रात्री ८ या वेळेत दररोज कलारसिकांना विनामूल्य बघता येईल. गणपती, कृष्ण यासह वेगवेगळे विषय त्याने रेखाटले असून आकर्षक रंगसंगतीत रंगवले आहेत. जास्तीत-जास्त रसिकांनी प्रदर्शनाला भेट देऊन करणला प्रोत्साहन द्यावे, असे आवाहन संयोजकांनी केले आहे.

# मुकेश यांच्या लोकप्रिय गाण्यांमधून मानवंदना : जन्मशताब्दी सांगतेनिमित्त रंगली ग्रँड मैफल

**नाशिक । प्रतिनिधी**



तीस वर्षांच्या कारकिर्दीत दहा हजारांपेक्षा जास्त गाणी गाणाऱ्या व हिंदी चित्रपटसृष्टी आपल्या सुरेल आवाजाने गाजवणाऱ्या मुकेश यांच्या जन्मशताब्दीची काल सांगता झाली. त्यानिमित्ताने अफलातून म्युझिक लव्हर्स ग्रुपतर्फे वर्षभर सुरु असलेल्या सांगतिक यज्ञाची सुरेल सांगता करण्यात आली.

शनिवारी (दि.२२) सायंकाळी ५.३० वाजता सायंकाळी ही विनामूल्य ग्रँड मैफल प. सा. नाट्यगृहात रंगली. मुकेश यांच्या गाजलेल्या गाण्यांमधून त्यांच्या स्मृतींना मानवंदना देण्यात आली.

प्रारंभी प्रमुख पाहुणे माजी आमदार वसंत गिते, अंकुश पवार, भास्करराव बनकर, करसनभाई ठक्कर, किशोर ठक्कर, सुनील भुतडा, सुधीर सराफ, प्रशांत जुन्नरे, सुनीता चौहान यांच्या हस्ते दीपप्रज्वलन करण्यात आले. दिल जलता है, हमसफर मेरे हमसफर, जो तुमको हो पसंद, ये मेरा दिवानापन, सावन का महिना, क्या खूब लगती हो, आसू भरी है अशा २५ गाण्यांनी श्रोत्यांना आनंद दिला. स्वर्गीय मुकेश यांच्या १०० व्या जयंतीच्या औचित्याने गेल्या वर्षी गायक विनोद सरदेशमुख यांनी मांडलेल्या संकल्पनेला अफलातून ग्रुपचे संस्थापक हरीशभाई ठक्कर यांनी मूर्त रूप दिले. वर्षभर दरमहा २२ तारखेला झालेल्या ११ मैफलीत आतापर्यंत १५० कलाकारांनी सहभाग घेऊन मुकेश यांची गाणी सादर केली आहेत.

या सुरेल श्रृंखलेतील अखेरच्या ग्रँड मैफलीत प्रमुख गायक विनोद सरदेशमुख, विरेंद्रसिंग परदेशी, संजय निकम, हरीशभाई ठक्कर, उमेश मालवी, गायिका नमिता राजहंस, अश्विनी सरदेशमुख, सुरभी गौड तसेच पाहुणे गायक प्रकाश गोसावी, मयूर टुकडीया, हर्षद शेजवळ, संजय साळवे, संजय अडावदकर यांनी मुकेश यांची गाणी सादर केली. सुरेश दीडमिशे आणि दिनेश गोविल यांनी निवेदनाद्वारे मुकेश यांचा सुरेल काळ पुन्हा जिवंत केला. पवन वंजारी, सुरेश काफरे व सहकाऱ्यांनी तांत्रिक बाजू सांभाळली. नाशिककर रसिकांनी मोठ्या संख्येने उपस्थित राहून मैफलीचा आस्वाद घेतला.

# एनएमआयएमएस स्कूल ऑफ कॉमर्सच्या ऑनर्स, अकाउंटिंग आणि फायनान्स अभ्यासक्रमांसाठी प्रवेश सुरू

**धुळे । प्रतिनिधी**

एसव्हीकेएम च्या एनएमआयएमएस (छ्चखचड) धुळे कॅम्पस येथील स्कूल ऑफ कॉमर्सने त्यांच्या नव्याने सुरू झालेल्या बी.कॉम प्रोग्रॅमची अधिकृतपणे घोषणा केली असुन या अभ्यासक्रमासाठी प्रवेश घेण्यासाठी अर्ज प्रक्रिया सुरू आहेत. धुळे शहरातील इच्छुक ऑनर्स, अकाउंटिग व फायनान्सच्या शैक्षणिक वर्ष २०२३ साठी प्रवेश अर्ज करू शकतात. बी कॉम हा प्रामुख्याने तीन वर्षांचा अंडरग्रेजुएट अभ्यासक्रम असुन तो विद्यार्थ्यांना सखोल थेरॅटिकल आणि प्रॅक्टिकल शिक्षण देण्यासाठी, वाणिज्य क्षेत्रात यशस्वी करिअरसाठी आणि आवश्यक कौशल्यांसह सुसज्ज करण्यासाठी खास प्रकारे डिझाइन केला गेला आहे. येथे प्रवेश घेण्यासाठी १२ वी इयत्तेत किमान ५५% गुण आवश्यक असुन यासाठी कोणत्याही अन्य प्रवेश परीक्षेची आवश्यकता नाही. हा अभ्यासक्रम अश्या गणितीय पार्श्वभूमी नसलेल्या विद्यार्थ्यांसाठी आदर्श आहे ज्यांना अकाउटिंग आणि फायनान्स क्षेत्रात करिअर करायचे आहे. या पाठ्यक्रमात अनेक अभ्यासक्रमांचे अद्वितीय मिश्रण आणि अनेक विषयांचा आढावा पहावयास मिळेल. येथे विद्यार्थ्यांना वाणिज्य मधील क्लिष्टता, अर्थशास्त्र व व्यवस्थापन शिकवले जाईल. त्यांनी निवडलेल्या क्षेत्रासाठी येथे एक व्यापक दृष्टीकोन प्रदान केला जाईल. जेणेकरूण त्यांचा या विषयांतील पाया मजबूत होईल.

या अभ्यासक्रमात फायनॅन्शीयल मार्केट आणि इन्स्टीट्युशन इन्वेस्टमेन्ट ॲनेलिसीस, पोर्टफोलिओ मॅनेजमेंट, वेल्थ मॅनेजमेन्ट ॲण्ड बॅकिंग आणि इन्शुरन्स यासारख्या अत्याधुनिक विषयांचा समावेश आहे, ज्यामुळे विद्यार्थ्यांना इक्विटी मार्केट, फ्युचर्स आणि ऑप्शन्स मार्केट्स, बाँड मार्केट, करन्सी मार्केट आणि फायनान्सचे डायनॅमिक जग समजुन घेण्यात मदत होईल.त्यांच्या मुख्य वैशिष्ट्यांपैकी एक म्हणजे ॲप्लिकेशन बेस लर्निंगवर लक्ष केंद्रित करणे. याचबरोबर प्रेजन्टेशन्स, केस स्टडी, परस्परसंवादी सत्रे आणि प्रोजेक्ट्स द्वारे वास्तविक जगातील परिस्थितीचा आढावा घेणे तसेच इनकम टॅक्स रिटर्न भरणे, एक्सेल वापरून फायनॅन्शियल मॉडेलिंग, शेअर बाजाराचे विश्लेषण, बिजनेस कम्युनिकेशन्स आणि सॉफ्ट स्किल्स ट्रेनिंग यासारख्या क्षेत्रांमध्ये आवश्यक कौशल्ये विकसित करणे.

सीए कुणाल पासरी, आय/सी असोसिएट डीन, एनएमआयएमएस स्कूल ऑफ कॉमर्स, धुळे, बी कॉम. ऑनर्स, अकाउटिंग आणि फायनान्स हा फायनान्स डोमेन अंतर्गतचा एक प्रोग्रॅम आहे, जो चार्टर्ड अकाउंटन्सी सारख्या व्यावसायिक वित्त अभ्यासक्रमांचा पाठपुरावा करणाऱ्या विद्यार्थ्यांसाठी उपयुक्त आहे.एनएमआयएमएस धुळे कॅम्पस विद्यार्थ्यांना आपल्या अनिवार्य इंटर्नशिपद्वारे प्रत्यक्ष अनुभव घेण्याची एक विशिष्ट संधी प्रदान करते. या हँड-ऑन ट्रेनिंग मुळे त्यांना आपल्या भविष्यातील चांगल्या करिअरसाठी आवश्यक कौशल्ये, आत्मविश्वास आणि इंडस्ट्री एक्सपोजर मिळतो. इंटर्नशिप आणि जॉब प्लेसमेंटसह पदवीधरांना मदत करण्याच्या त्यांच्या परंपरेचा त्यांना मोठा अभिमान आहे. अनेक इंडस्ट्री कनेक्शनच्या मजबूत नेटवर्कसह, विविध क्षेत्रातील नामांकित कंपन्या या कॅम्पसमधील नवीन पदवीधारकांना चांगल्या संधी देतात. मुंबईतील ट्रेनिंग अँड प्लेसमेंट सेल सध्याच्या तृतीय वर्षाच्या विद्यार्थ्यांना निरंतर सहाय्य प्रदान करत आहे. यावर्षी विविध उद्योगांमधील अंदाजे ३५ कंपन्यांनी येथे चांगल्या रिक्रुटमेन्टच्या संधी दिल्या आहेत.अनेक उद्योजक येथील अनेक प्रतिभावान पदवीधरांना नियुक्त करण्यास उत्सुक आहेत. पीडब्ल्यूसी, बायजूस, अर्न्स्ट आणि यंग इंडिया, गोदरेज आणि बॉयस, एक्सेंचर, व्होडाफोन आयडिया लिमिटेड, क्रिसिल, टाटा स्ट्रॅटेजिक मॅनेजमेंट आणि प्लॅनेट स्पार्क्स यांसारख्या प्रख्यात उद्योजकांनी २०२३ साठी येथे कॅम्पस प्लेसमेंट्सचे आयोजन केले होते जेथे या ग्रॅज्युएट्सने ६.५ ते ७.२५ प्रतिवर्ष सारखे उत्तम सॅलरी पॅकेज मिळवले आहेत.

# नाशिक महानगर भाजपातर्फे लोकमान्य टिळक यांना अभिवादन

**नाशिक । प्रतिनिधी**




भारतीय जनता पार्टीतर्फे वसंतस्मृती कार्यालयात लोकमान्य बाळ गंगाधर टिळक यांची जयंती उत्साहात साजरी झाली. प्रारंभी शहराध्यक्ष प्रशांत जाधव, पवन भगूरकर, जयेश भाई ठक्कर, अभय तातेड यांच्या हस्ते लोकमान्य टिळक यांच्या प्रतिमेस पुष्पहार अर्पण करून त्यांना अभिवादन करण्यात आले.

भारताच्या स्वातंत्र्य लढ्यात टिळकांचे योगदान मोलाचे आहे. या लढ्याला त्यांनी समाजातील सर्व लोकांचे अधिष्ठान मिळवून दिले. त्यामुळेच आधुनिक भारताच्या इतिहासात टिळकयुग हा महत्वाचा टप्पा मानण्यात येतो. असे यावेळी शहराध्यक्ष प्रशांत जाधव यांनी तसेच वसंत उशीर, अरुण शेंदुर्णीकर यांनी आपल्या मनोगतात सांगितले.

याप्रसंगी बिल्डर असोसिएशनचे पदाधिकारी सुनिल गंवादे, अनंत हिरे, शंतनु देशपांडे, मयुर कपाटे, अश्विन आव्हाड, प्रशांत पाटील, भाविक ठक्कर, नितीन सोनवणे, शशांक देशपांडे, राकेश पाटील, हेमंत शुक्ल, पांडुरंग सावजी, सुरज राठी, विजय कुलकर्णी आदींसह भाजपा कार्यकर्ते उपस्थित होते.

**निधन वार्ता**

### पंडित शशिकांत मुजुमदार



**नाशिक ।** पंडित शशिकांत मुजुमदार (८७) यांचे अल्पश्या आजाराने शनिवारी रात्री निधन झाले. त्यांच्या पश्चात पत्नी, दोन मुलगे, सून, दोन बंधू असा मोठा परिवार आहे. काल रविवारी सकाळी अमरधाममध्ये अंत्यसंस्कार करण्यात आले. त्यांच्या निधनाने संगीत क्षेत्रात शोक व्यक्त होत आहे. वृत्तपत्र छायाचित्रकार रघुनंदन मुजुमदार यांचे ते वडील होत.

# उपमुख्यमंत्री पवारांच्या वाढदिवसानिमित्त रक्तदान शिबीर संपन्न

**धुळे । प्रतिनिधी**




येथील राज्याचे उपमुख्यमंत्री अजित पवार यांच्या वाढदिवसानिमित्त धुळे शहरातील वाडीभोकर रोडवरील स्टेडिअम परिसरात शनिवारी रक्तदान शिबीराचा कार्यक्रम संपन्न झाला. पार्थदादा पवार फाऊंडेशनतर्फे या शिबीराचं आयोजन करण्यात आलं होतं, या शिबीरात अनेक कार्यकर्त्यांसह इच्छुक दात्यांनी रक्तदान केलं. शिबीर यशस्वीतेसाठी आयोजक तथा पार्थदादा पवार फाऊंडेशनचे जिल्हाध्यक्ष कल्पेश अनिल चव्हाण, राज ढोढरे, रवि तावडे, विक्की देवरे, अशोक चौधरी, बबलु बैसाणे, वेदांत पाटील, सुनील थोरात, स्वप्निल बागुल, अविनाश नागमल इत्यादींनी परिश्रम घेतले. गौरवण्यात आले.या वेळी आदर्श पालकत्व कसे असावे यावर आधारित व्हिडिओ चे प्रसारण करण्यात आले.

## जाहिर नोटीस

तमाम जनतेस तसेच सर्व वित्तीय संस्था, बँका, पतसंस्था व सर्व संबंधीतांना या जाहीर नोटीसीने कळविण्यात येते की, खालील नमुद परिशिष्टातील मिळकत सि.स. नं. ४६९७/२४८ त्याशी क्षेत्र १११-५२ चौ. मी. या पैकी विमल पंडीत थोटे यांच्या नावे पश्चिमेकडील क्षेत्र ३७-१७ चौ. मी. असे आहे.. याच्यावर आमचे अशिल नामे संगिता संतोष थोटे हे वारस असुन त्यांची मालकीची व ताबे उपभोगातील असून त्यांनी सदर वर नमुद घर मिळकत हिचेवर कौटुंबिक वाद चालु आहेत. ती कोणीही सौदा, करार, बक्षीस, अदलाबदल, गहाण, लिज, लिन, लिव्ह ण्ड लायसन्स, भाडेपट्टा, वारस हक्क, मुखत्यार, मृत्युपत्र, वहिवाट, बोजे, ऋणभार, ताबा, आरक्षण, जप्ती, कुळ, खरेदी-विक्री, न्यायिक व इतर प्रकरणे अथवा इतर कोणत्याही स्वरूपाचे करू नये. जर केल्यास या नोटीसीद्वारे रद्दबातल ठरविण्यात येईल. व त्यांचेवर योग्य त्या दिवाणी व फौजदारी स्वरुपाची न्यायालयात दावे, केसेस, फाटे करावे लागतील. यास ते सर्वस्वी जबाबदार राहतील.

वरील नमुद परिशिष्टातील मिळकतीमध्ये कोणाचेही कोणत्याही स्वरूपाचे जसे त्यांनी ही नोटीस प्रसिध्द झाल्यापासून ७ दिवसांच्या आत वरील नमुद पत्यावर पुराव्यानिशी लेखी हरकती नोंदवाव्यात. ७ व्या दिवसानंतर आलेल्या हरकती, लेखी पुराव्याशिवाय घेतलेल्या हरकती ग्राहय धरण्यात येणार नाहीत. तसेच परस्पर वर्तमानपत्रात प्रसिध्द केलेल्या हरकती देखील विचारात घेतल्या जाणार नाहीत, याची नोंद घ्यावी.

हि जाहिर नोटीस आमचे पक्षकाराने दिलेल्या माहीती व दाखवलेल्या कागदपत्रांवरुन व सांगण्यावरुन आमचे मार्फत प्रसिध्दीस दिली असे.

दि. २१/०७/२०२३ संगिता संतोष थोटे

# महाले फार्मचे रस्ते गेले खड्ड्यात : 'रस्त्यात खड्डे की खड्ड्यात रस्ते'

**नाशिक । प्रतिनिधी**

**महाले फार्म येथुन ये-जा करणाऱ्या नागरिकांना रस्त्यात खड्डे असल्याने खुप त्रास सहन करावा लागत आहे. तरी महापालिकेकडून लवकरात-लवकर हा रस्ता नवीन करावा किंवा रस्त्याची किमान डागडुजी तरी करावी, अशी आमची मागणी आहे.**
**- सागर चौधरी, उपविभाग प्रमुख, शिवसेना**



महाले फार्म महाराणा प्रताप चौक ते उदय कॉलनी पवननगर रस्ता महापालिकेने ८ महिन्यांपासून ड्रेनेज व जलवाहिनीच्या कामासाठी खोदून ठेवल्याने हा रस्ता वाहतुकीसाठी बंद होता. शिवसेनेचे उपविभाग प्रमुख सागर चौधरी यांच्या पाठपुराव्यानंतर तब्बल ८ महिन्यानंतर काम पूर्ण झाले व हा रस्ता वाहतुकीसाठी सुरु करण्यात आला. परंतु १-२ महिने रस्ता सुरु होऊन झाले आणि आता या रस्त्याची पावसामुळे अक्षरशः चाळण झाल्याचे चित्र आहे. रस्त्यात खड्डे की खड्यात रस्ते याचा नागरिकांमध्ये संभ्रम आहे.

परिसरातील नागरिकांसह वाहनचालकांना यामुळे मोठ्या प्रमाणावर अडचणींचा सामना करावा लागत आहे. पूर्वीचा प्रभाग क्रमांक २९ व सध्याचा प्रभाग क्रमांक ३७ मधील महाले फार्म महाराणा प्रताप चौक ते उदय कॉलनी पवननगर हा रस्ता उपेंद्र नगर, त्रिमूर्ती चौक, सातपुर औद्योगिक वसाहत, त्रंबकरोड आदी परिसराला जोडला जाणारा नजीकचा रस्ता असल्याने याठिकाणी वाहतुकीची वर्दळ सतत सुरु असते. मात्र गेल्या अनेक महिन्यांपासून या ठिकाणच्या रस्त्याची दुरावस्था झालेली आहे. रस्त्यात मोठाले खड्डे असल्याने परिसरातील नागरिकांना इतरत्र जाण्यासाठी खुप त्रास सहन करावा लागत आहे. या रस्त्यातील खड्यांमुळे नोकरदार वर्ग तसेच विध्यार्थ्यांना देखील कसरत करत या ठिकाणाहून मार्गक्रमण करावे लागत आहे.

खड्यांमध्ये पाणी साचत असल्याने डेंग्यू व मलेरिया सारख्या आजारांना आमंत्रण देण्याचे काम महापालिका करते आहे का? असा प्रश्न उपस्थित केला जात आहे.

मनपाने महाले फार्म परिसरातील रस्त्याचे काम लवकरात लवकर पूर्ण करावे. अशी मागणी शिवसेनेच्या वतीने नवीन नाशिक उपविभाग प्रमुख सागर चौधरी व स्थानिक रहिवाशांकडून करण्यात आली आहे.

## न्यूज कॉलम

### रोटरॅक्ट क्लब ऑफ शिंदखेडाचे पदग्रहण

**शिंदखेडा ।** रोटरॅक्ट क्लब ऑफ शिंदखेडा चा १६ वा पदग्रहण सोहळा नुकताच झाला. अध्यक्षपदी सागर कासार तर सचिवपदी राहुल वर्मा यांची निवड झाली. गटनेते अनिल वानखेडे, युवा उद्योजक गिरीष टटिया, इन्स्टॉलेशन ऑफिसर डिस्ट्रिक्ट ३०६० चे डी. आर. आर. ओमिषा जानी, डिस्ट्रिक्ट सेक्रेटरी हर्ष शाह उपस्थित होते. गेस्ट ऑफ ऑनर म्हणून प्रथमेश गांधी, ऋषभ खिंवसरा उपस्थित होते. या वेळी बोर्ड ऑफ डायरेक्टर्सची नियुक्ती करण्यात आली. त्यात सागर देसले (उपाध्यक्ष), अक्षय बाफना (माजी अध्यक्ष), योगेश देसले (खजिनदार), वैभव देसले, हरीश मोरे, पवन पवार, नीलेश तलवारे, अमोल गोसावी, लखन सोनवणे, लोकेश जैन, केतन पारख, महेंद्र वाडीले, अमरदीप गिरासे, भागवत डिगराळे, राम सोनवणे यांनी पदभार स्वीकारला. माजी अध्यक्ष महेंद्र पाटिल, हर्शल भामरे, संदीप चौधरी, गणेश बोरसे उपस्थित होते.

### ककाणी विद्यालयाचे शिष्यवृत्ती परीक्षेत यश

**म्हसदी ।** ककाणी (ता. साक्री) येथील आदर्श माध्यमिक विद्यालयाचे बारा विद्यार्थी शिष्यवृत्ती परीक्षेच्या गुणवत्ता यादीत आले. पाचवीत मयुरी बेडसे, चेतना बेडसे, मनीष बेडसे, करिश्मा मोहिते, ईशान बेडसे, कुंदन शेवाळे, शीतल अहिरे, तर आठवीत कोमल बेडसे, किरण देवरे, प्रियंका बेडसे, जयेश शिंदे व पीयूष देवरे शिष्यवृत्तीसाठी पात्र ठरले. यशस्वी विद्यार्थ्यांना मुख्याध्यापक भटू वाणी, व्ही. वाय. कुवर, जी. एम. मारनर, पी. डी. शेवाळे, के. व्ही. देवरे, एन. डी. शिंदे, प्रसाद बेडसे, आदींचे मार्गदर्शन लाभले.

# फागणे येथे जल जीवन मिशनसह पाच कोटीच्या विकास कामांचे भूमिपूजन

**धुळे । प्रतिनिधी**

केंद्र शासनाच्या महत्त्वकांक्षी जलजीवन मिशन कार्यक्रमांतर्गत दोन कोटीच्या योजनेसह जिल्हा परिषदेच्या विविध लेखाशीर्षाखाली फागणे गावातील विकास कामांसाठी सुमारे पाच कोटीचा निधी मंजूर करण्यात आला आहे. या विकास कामाचे भूमिपूजन खा. डॉ. सुभाष भामरे, जिल्हा परिषदेचे अध्यक्ष इंजिनियर सौ.अश्विनी पाटील यांच्या हस्ते करण्यात आले. कोट्यावधींची विकास कामे फागणे गावात सुरू झाल्याने सर्वसामान्य ग्रामस्थांनी समाधान व्यक्त केले आहे.

फागणे येथे विकास कामांच्या शुभारंभ कार्यक्रम प्रसंगी खासदार डॉक्टर सुभाष भामरे, जिल्हा परिषदेचे अध्यक्ष इंजिनिअर अश्विनी पाटील, जिल्हा परिषदेचे माजी कृषी सभापती प्राध्यापक अरविंद जाधव ,सरपंच विद्या पाटील, मोहनशेठ सिंघवी, गोकुळ सिंघवी, नगराज पाटील, राजेश रावसाहेब यांच्यासह विविध मान्यवर उपस्थित होते. कार्यक्रमाचे अध्यक्षस्थानी भालेराव जयराम पाटील हे होते. फागणे गावासाठी आवश्यक असलेल्या विकास कामांचा अभ्यास करून जि प अध्यक्ष इंजी. अश्विनी पाटील, माजी कृषी सभापती अरविंद जाधव यांनी नियोजन केले. जिल्हा परिषदेच्या वेगवेगळ्या लेखाशीर्षातून फागणे गावाच्या सर्वांगीण विकासासाठी कोट्यावधीचा निधी मंजूर केला. या विकास कामांशिवाय केंद्राच्या



जलजीवन मिशन या महत्वकांक्षी प्रकल्पात फागणे या गावाचा समावेश करण्यात आला. फागणे गावात २१ गाव पाणीपुरवठा योजना कार्यान्वित होती, मात्र जलजीवन मिशन योजनेत समावेश करून दोन कोटीची योजना मंजूर करण्यात आली आहे, ज्याप्रमाणे पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या संकल्पनेतून 'हर घर जल योजना' राबविण्यात आली. त्या संकल्पनेच्या पार्श्वभूमीवर जिल्हा परिषद अध्यक्ष इंजि.अश्विनी पाटील यांनी पंधराव्या वित्त आयोगाच्या निधीतून 'हर घर कनेक्शन' हा उपक्रम हाती घेतला असून फागणे येथील जवळपास २५०० घरांना नळ कनेक्शन मोफत दिले जाणार आहे. यासाठी पाटील यांनी सुमारे ५३ लक्ष रुपये मंजूर करून दिले आहेत. याबरोबरच फागणे येथील विविध विकास कामांसाठी कोट्यावधीचा निधी मंजूर करण्यात आला आहे. त्या विकास कामांचे देखील खासदार डॉभामरे आणि अध्यक्ष पाटील यांच्या हस्ते भूमिपूजन करण्यात आले.

यामध्ये नागरी सुविधा कार्यक्रमांतर्गत मुख्य रस्त्याच्या सुशोभीकरणसाठी रस्त्यालगत पथदिवे लावण्याकरिता रुपये २५ लक्ष, कॉलनी परिसरात रस्ता काँक्रिटीकरण कामासाठी रुपये २० लक्ष, महावीर भवन परिसरात जन सुविधा कार्यक्रमांतर्गत पेवर ब्लॉक बसविण्यासाठी रुपये १०लक्ष, जन सुविधा कार्यक्रमांतर्गत स्मशानभूमी येथे बैठक व्यवस्था तयार करणे साठी रुपये १५ लक्ष, १५ व्या वित्त आयोग अंतर्गत शनी मंदिर ते दत्त मंदिर रस्ते कामासाठी रुपये पंधरा लक्ष बाभूळवाडी रोड लगत असलेल्या विजया हाऊसिंग सोसायटीत पेवर ब्लॉक बसविण्यासाठी रुपये पाच लक्ष, पंधरा वित्त आयोग अंतर्गत बंधीत निधीतून पुरुष शौचालयाकरिता १० लक्ष, महिला शौचालय युनिट करिता रुपये १० लक्ष, दलित वस्ती कार्यक्रमांतर्गत इंदिरानगर परिसरात रस्ता काँक्रिटीकरण कामासाठी रुपये १० लक्ष, ठक्कर बाप्पा आदिवासी विकास कार्यक्रमांतर्गत संरक्षण भिंतीसाठी रुपये १५ लक्ष, १५ व्या वित्त आयोग अंतर्गत भूमिगत गटारीच्या कामासाठी १५ लक्ष , पंधरावा वित्त आयोग अंतर्गत शेती शिवार रस्त्यांसाठी रुपये १५ लक्ष, शाळा दुरुस्ती कार्यक्रमांतर्गत रुपये १५ लक्ष, गौण खनिज कार्यक्रमांतर्गत शाळेकडे जाणाऱ्या रस्त्यासाठी रुपये १५ लक्ष, तीर्थक्षेत्र विकास कार्यक्रमांतर्गत बयामाय तीर्थक्षेत्र येथे सामाजिक सभागृहासाठी रुपये १५ लक्ष, असा सुमारे पाच कोटीचा निधी मंजूर करण्यात आला. गावाच्या सर्वांगीण विकासासाठी निधी मिळाल्याने ग्रामस्थानी समाधान व्यक्त केले. कार्यक्रमास राजेंद्र पाटील, भास्कर पाटील, मधुकर पाटील, अनिल सुराणा, बाबुलाल पाटील, प्रकाश छाजेड, सुभाष देसले, रोहिदास पाटील, संजय धनगर, धनराज पाटील, भटू पाटील, किशोर वाणी, महेंद्र पाटील, भटू पाटील, भालचंद्र पाटील, पवन पाटील, विश्वास अहिरे, प्रवीण सूर्यवंशी, युवराज पाटील, विनायक चौधरी, पोपट चौधरी, सचिन चौधरी आदी उपस्थित होते.

# सार्वजनिक बांधकाम भुसे यांनी घेतली राज्यातील रस्त्यांसंदर्भात आढावा बैठक

## वाहतूक कोंडीच्या ठिकाणी पोलिसांच्या मदतीसाठी वॉर्डन नेमण्याच्या सूचना

**मुंबई । प्रतिनिधी**

राज्याचा सार्वजनिक बांधकाम विभागाचा कार्यभार मंत्री दादाजी भुसे यांच्याकडे आल्यानंतर ना. भुसे यांनी तातडीने राज्यातील रस्त्यांच्या स्थितीचा आढावा घेतला आहे. काल रोजी वडपे-ठाणे महामार्गावरील रस्त्यांच्या कामांची पाहणी मंत्री दादाजी भुसे यांनी केली. यावेळी पावसाळ्यात या मार्गात मोठ्या प्रमाणात वाहतूक कोंडीची समस्या उद्भवण्याची शक्यता असल्याने या सर्व बाबींचा विचार करून मंत्री भुसे यांनी आढावा घेतला.

सार्वजनिक बांधकाम मंत्रिपदाची धुरा हाती आल्यानंतर



राज्यातील महत्वाच्या विषयांवर मंत्री भुसे यांनी अधिकाऱ्यांच्या बैठका घेत रस्त्यांची स्थिती सुधारण्या संदर्भात आदेश दिले आहेत. पावसाळ्यात प्रवाशांना नाहक त्रास सहन करावा लागणार नाही तसेच कुठेही वाहतूक कोंडी होणार नाही. याबाबत उपाययोजना राबविण्यात याव्यात अशा सूचना दिल्या आहेत.

पावसाळ्यात ज्या मार्गात वाहतूक कोंडी होत असेल त्या ठिकाणी कोंडी होऊ नये रहदारी सुरळीत रहावी, यासाठी तातडीने उपाय योजना कराव्यात पोलिसांच्या मदतीसाठी वॉर्डन नेमण्याच्या सूचना देखील ना. भुसे यांनी दिल्या आहेत.

# मविप्र कृषी महाविद्यालयाच्या सफरचंद लागवडीच्या प्रयोगाला यश

**नाशिक । प्रतिनिधी**

मविप्र संस्थेच्या दुलाजी सिताराम पाटील कृषी महाविद्यालयाच्या चाचडगाव, ता.दिंडोरी येथील प्रक्षेत्रावर हरमन ९९ या काश्मिरी सफरचंद प्रजातीची लागवड करण्यात आली होती. या सफरचंद लागवडीच्या प्रयोगास यश मिळाले असून सफरचंदाच्या झाडाला पहिल्यांदा सफरचंद लागल्याने संस्थेच्या कृषी महाविद्यालयाचे जिल्ह्याभरातील शेतकरी सभासद व हितचिंतक यांच्याकडून या यशस्वी प्रयोगाबद्दल कौतुक होत आहे.

संस्थेचे सरचिटणीस ड.नितीन ठाकरे, उपसभापती देवराम मोगल, शिक्षणाधिकारी डॉ. अजित मोरे, प्राचार्य डॉ. आय. बी. चव्हाण यांनी यासंदर्भात दिली आहे. कोकणगाव येथील प्रक्षेत्रावर सफरचंदासोबतच अननस, आंब्याच्या सात प्रकारच्या जाती, जायफळ, कोकम, दालचिनी, नारळाच्या विविध जाती, लेमन ग्रास, फणस,



पेरू, लिंब व इतर वनस्पतींची देखील प्रयोगशील लागवड महाविद्यालयाच्या वतीने केलेली आहे.

# गोविंदनगर रस्त्यावरील चिखल हटविला

**नाशिक । प्रतिनिधी**

शिवसेना (उद्धव बाळासाहेब ठाकरे) पक्ष व सत्कार्य फाउंडेशनच्या इशार्यानंतर गोविंदनगरच्या मुख्य रस्त्यावरील चिखल काल गुरुवारी, २० रोजी हटविण्यात आला. पाण्याच्या फवार्याने रस्ता धुवून काढण्यात आला.

आरडी सर्कल, बाजीरावनगर कॉर्नर ते इंडिगो पार्कपर्यंत खासगी बांधकामे मोठ्या प्रमाणात सुरू आहेत. डंपर व इतर वाहने, तसेच बांधकाम साईटवरील चिखल रस्त्यावर आल्याने चारचाकी वाहने चालविणे कठीण झाले होते. अनेक दुचाकी घसरल्याने काहींना किरकोळ दुखापतीही झाल्या. सकाळ, सायंकाळ या रस्त्यावरून जॉगिंगला जाणार्यांची संख्याही मोठी आहे, त्यांनाही त्रास सहन करावा लागत होता. रस्त्यावरील चिखल त्वरित हटवावा, अन्यथा



तीव्र आंदोलन करण्यात येईल, असा इशारा सत्कार्य फाउंडेशनचे अध्यक्ष बाबासाहेब गायकवाड (देशमुख), शिवसेना कार्यकर्त्या चारुशीला गायकवाड (देशमुख) यांनी नागरिकांच्या वतीने दिला होता. महापालिका नगररचना विभागाने संबंधित बांधकाम व्यावसायिकांना सूचना दिल्या. दखल घेतल्याबद्दल नगररचना विभाग व संबंधितांचे बाबासाहेब गायकवाड (देशमुख), चारुशीला गायकवाड (देशमुख), बाळासाहेब मिंधे, मयुर आहेर, धवल खैरनार, संगीता देशमुख, प्रभाकर खैरनार, रवींद्र सोनजे, विनोद पोळ, डॉ. शशिकांत मोरे, विठ्ठलराव देवरे, भालचंद्र रत्नपारखी, ओमप्रकाश शर्मा, बाळासाहेब देशमुख, अशोक देवरे, निलेश ठाकूर, भारती देशमुख, वंदना पाटील, दिलीप निकम, हरिष काळे आदींनी आभार मानले आहेत.



# जागतिक लोकसंख्या दिवस कार्यक्रम संपन्न

**शिरपूर । प्रतिनिधी**

येथील आर. सी. पटेल माध्यमिक व उच्च माध्यमिक विद्यालयात जागतिक लोकसंख्या दिवस कार्यक्रम साजरा करण्यात आला.

या कार्यक्रमाचे औचित्य साधून निबंध स्पर्धा व चित्रकला स्पर्धा आयोजित करण्यात आली. कार्यक्रमाचे अध्यक्षस्थानी प्राचार्य पी.आर. साळुंखे, प्रमुख पाहुणे पर्यवेक्षक एन.ई.चौधरी उपस्थित होते. प्रतिमापूजनाने कार्यक्रमाची सुरुवात करण्यात आली. निबंध स्पर्धेसाठी इ. ५ वी ते इ. ७ वी (लहान गट) लोकसंख्या वाढीचे दुष्परिणाम व इ.८ वी ते इ.१० वी (मोठा गट) 'लोकसंख्या वाढ एक भस्मासूर' हे विषय होते. स्पर्धेचे परीक्षक एस. आर. सपकाळे व श्रीमती ए.बी.वाल्हे होते. प्राचार्य प्रदिप साळुंखे यांनी 'वाढत्या लोकसंख्येमुळे भेडसावणाऱ्या समस्या' याविषयी मार्गदर्शन केले. पर्यवेक्षक एन. ई. चौधरी यांनी लोकसंख्या वाढीवरील उपाययोजना विषयी मार्गदर्शन केले.

# शेतकऱ्यांच्या कापसाला कवडीमोल भाव उत्पादन खर्चावर आधारीत हमी भाव द्यावा

### आ.कुणाल पाटील यांची अधिवेशनात मागणी

**धुळे । प्रतिनिधी**



धुळे तालुक्यासह जिल्हयातील बहुसंख्य शेतकर्यांचा कापूस अद्यापही योग्य भावाअभावी घरातच पडून असून शेतकर्यांच्या कापसाला कवडीमोल भाव दिला जात आहे. दरम्यान सरकारने उत्पादन खर्चावर आधारीत कापसाला योग्य हमी भाव द्यावा अशी मागणी आ.कुणाल पाटील यांनी आज विद्याभवनात तारांकीत प्रश्नातून केली आहे.

मुंबईत महाराष्ट्र विधानसभेचे पावसाळी अधिवेशन सुरु आहेत. अधिवेशनाच्या दूसर्याच दिवशी आ.कुणाल पाटील यांनी शेतकर्यांचा जिव्हाळ्याचा प्रश्न उपस्थित करुन सभागृहाचे लक्ष वेधून घेतले आहे. अधिवेशनात धुळे ग्रामीणचे आ.कुणाल पाटील यांनी तारांकीत प्रश्न क्र.६४६२६ नुसार शेतकर्यांच्या घरात पडून असलेल्या आणि गरजेपोटी कमी भावाने विकला गेलेल्या शेतकर्यांच्या कापसाच्या प्रश्नावर आवाज उठविला. आपल्या प्रश्नात आ.पाटील यांनी म्हटले आहे कि, धुळे तालुक्यासह खान्देशात कापूस पिकाचे मोठ्या प्रमाणात उत्पादन घेतले जाते. मागील खरीप हंगामात शेतकर्यांनी कापसाची सर्वाधिक लागवड केली होती. अतिवृष्टी आणि विविध रोगराईचा सामना करीत शेतकर्यांनी कापसाचे उत्पादन घेतले. उत्पादन खर्चावर आधारीत सरकार योग्य हमी भाव देईल या आशेवर शेतकर्यांनी आपला कापूस घरात भरून ठेवला. मात्र खुल्या बाजारासह सरकारच्या कापूस खरेदी केंद्रावर शेतकर्यांना योग्य हमी भाव मिळाला नाही. दरम्यान दिवसेदिवस कापसाच्या भावात घसरण होत गेली आणि बळीराजा हवालदिल झाला. कापसाला हमी भाव मिळाला नसल्याने शेतकरी कर्जबाजारी झाला आहे. काही शेतकर्यांनी आर्थिक गरजेपोटी कमी भावात आपला कापूस नाईलाजाने विकावा लागला. तर आजही जास्तीत जास्त शेतकर्यांचा कापूस घरातच पडून आहे. त्यामुळे शेतकर्यांच्या कापसाला उत्पादन खर्चावर आधारीत योग्य हमी भाव द्यावा अशी मागणी आ.कुणाल पाटील यांनी अधिवेनशात केली आहे.

# राज्यस्तरीय वुशू स्पर्धेत धुळे जिल्हा प्रथम स्थानावर

### ४ खेळाडूंची राष्ट्रीय पातळीवर निवड

**धुळे । प्रतिनिधी**

अमरावती येथे २० व्या राज्यस्तरीय सब ज्युनिअर व ज्युनिअर वुशू स्पर्धामध्ये सब जूनियर ,ज्युनिअर व युथ या वयोगटात धुळे जिल्ह्याने उत्कृष्ट कामगिरी करत राज्यात प्रथम संघ विजेता हा बहुमान मिळविला. तसेच खेळाडूंनी चमकदार कामगिरी करत चार सुवर्ण, पाच रौप्य,व सात कास्यपदके पटकाविले. स्पर्धेत उत्कृष्ट कामगिरी करत सुवर्णपदक मिळविणाऱ्या खेळाडूंची राष्ट्रीय पातळीवर निवड झाली आहे.

ऑल महाराष्ट्र वुशू असोसिएशन यांच्या मान्यतेने व वुशू असोसिएशन ऑफ अमरावती जिल्हा द्वारे अमरावती येथे नुकत्याच झालेल्या २० व्या राज्यस्तरीय सब ज्युनिअर ,ज्युनिअर व युथ अजिंक्यपद वुशू स्पर्धेत धुळे




जिल्ह्यातील खेळाडूंनी सहभाग नोंदवला. या स्पर्धेत धुळे जिल्ह्यातील खेळाडूंनी उत्कृष्ट कामगिरी करीत राज्यात प्रथम संघ विजेता हा बहुमान मिळविला. तसेच वेगवेगळ्या वजनगटात खेळाडूंनी चमकदार कामगिरी केली. यामध्ये सोहम प्रल्हाद सूर्यवंशी २१ किलो, देशू संतोष परदेशी २४ किलो, हर्षल धनराज देवरे ३० किलो, हर्षित किशोर चव्हाण ४५ किलो वजन गटात उत्कृष्ट कामगिरी करत सुवर्णपदक पटकावले. तर फरहान गुलझार खान २१ किलो, यामिनी चंद्रशेखर तेली २४ किलो, दक्ष दिनेश घटी ३३ किलो,वीरा संतोष परदेशी ३९ किलो, निधी दिनेश शर्मा ५६ किलो, यांनी रौप्यपदक पटकाविले. निरंजन सोपान पद्मर २७ किलो, ओम जगदीश राणा ३३ किलो, तन्मय अविनाश पाटील ३९ किलो, दिव्या विशाल वाघ ३९ किलो, नीलम दीपक महाले ५२ किलो, यांनी उत्कृष्ट प्रदर्शन करत कास्यपदक पटकाविले. तसेच वेदांत विशाल वाघ ३९ किलो, जान्हवी संतोष नेरकर ३९ किलो, जान्हवी अविनाश सोनवणे ४५ किलो, जयेश नानाजी वनीस ४५ किलो, यश चंद्रशेखर तेले ४८ किलो, यांनी सहभाग नोंदविला. त्यांच्या या कामगिरीबद्दल संपूर्ण जिल्ह्यात त्यांचे कौतुक होत आहे. या सर्व खेळाडूंना धुळे जिल्हा वुशू असोसिएशनचे सचिव व प्रशिक्षक श्री. राहुल डी. बर्वे यांचे मार्गदर्शन लाभले.

शारदा शैक्षणिक व सामाजिक संस्था
Admission Open
विद्याधन महाविद्यालय, वलवाडी, धुळे
NAAC Accredited 'B' Grade – वडेल रोड, एमएसईबी जवळ, वलवाडी, धुळे
कवयित्री बहिणाबाई चौधरी उत्तर महाराष्ट्र विद्यापिठ जळगाव, कोड नं. 200111
B.Sc. | B.C.A | M.M.S./M.C.M.
डिप्लोमा उत्तीर्ण झालेल्यांना S.Y.B.Sc. ला प्रवेश SC/ST साठी मोफत
संपर्क: प्रा.ललिता निकम: 8862044791, प्रा.जागृती पाटील: 7887934365
यशवंतराव चव्हाण महाराष्ट्र मुक्त विद्यापिठ, नाशिक कोड नं. 5299A
B.A., B.C.A, B.Sc., M.A., M.C.A., M.B.A.
सर्व अभ्यासक्रमांना सत्यप्रतीवर (झेरॉक्स) प्रवेश मिळेल.
प्रा.हर्षल पाटील: 9421283577, श्री.नितेश पाटील: 9922116438,
प्रा.भूषण पाटील: 7709100798
शासन मान्यताप्राप्त एम.एस.बी.टी.ई. मुंबई संलग्नीत कोड नं.2053
P.G.D.M.L.T. Advanced Diploma in Medical Laboratory Technology
पात्रता – बीएस्सी केमेस्ट्री, बॉटनी, झुऑलॉजी, मायक्रो बायोलॉजी/ बी.फार्म/बी.ए.एम.एस./बी.डी.एस./एम.बी.बी.एस.
संपर्क : प्राचार्य डॉ.के.बी.पाटील – 9422288518,
सौ.शारदा पाटील – 9423496344
प्राचार्य डॉ.आर.बी.पवार: 9420375735,
प्रा.डॉ.योगेश बोरसे: 9423378936, श्री. हर्षल पाटील: 9421283577

CMYK

दैनिक लक्ष महाराष्ट्र



# कपाशी पिकाच्या पहाणीसाठी आमदार शेती शिवारात












धुळे।
धुळे तालुक्यात कापूस पिकावर लाल्या,करपारोगाचा मोठ्या प्रमाणात प्रादुर्भाव होत आहे. शेतातील कपाशीची संपूर्ण झाडेच उपटून फेकावी लागत आहे. हे मोठे संकट असून तातडीने पंचनामा करुन शासनास अहवाल सादर करावा. शेतकर्यांना नुकसान भरपाई मिळवून देण्यासाठी विधानभवनात लढा दिला जाईल.दरम्यान याबाबत आधी मी अधिवेशनात मागणी केली आहे. त्यामुळे शेतकर्यांनी धीर सोडू नये त्यांच्या पाठीशी मी खंबीरपणे उभा असल्याचे सांगत आ.कुणाल पाटील यांनी धुळे तालुक्यातील शेतकर्यांना कापूस पिकाच्या पहाणीप्रसंगी धीर दिला. यावेळी आ.पाटील यांच्यासोबत जिल्हा कृषी अधिक्षक,तहसिलदार, तालुका कृषी अधिकारी आणि कृषी विज्ञान केंद्राचे प्रकल्प समन्वयक, किटक शास्त्रज्ञ यांचे पथक उपस्थित होते. कापूस पिकावर लाल्यासह विविध रोगाराईचा प्रादुर्भाव झाल्याने शेतकरी हवालदिल झाला आहे. त्यामुळे आ.कुणाल पाटील यांनी तहसिलदार व कृषी विभागाच्या अधिकार्यांसोबत मुकटी,अजंग, काळखेडे शिवारात जाऊन पहाणी केली. आ.पाटील यांनी फागणे, वणी शिवार, अजंग,काटसर,मुकटी, काळखेडे शिवारातील कापूस पिकाची पहाणी केली. पहाणी दरम्यान शेतकर्यांनी हवालदिल होवून आपली कैफियत मांडली. मे महिन्यापासून लागवड करण्यात आलेल्या कापसाची वाढ खुंटली आहे. तर अनेक ठिकाणी लाल्या,मर,करपा रोगामुळे पिकावर दुष्परिणाम झाल्याचे दिसून आले. कापूस पिकाची पाने लाल झाली असून पानगळ सुरु झाली आहे. तर काही ठिकाणी रोगराईचा प्रादुर्भाव होवून कपाशीच्या झांडीच पाने कुरतडली जात असल्याचे निदर्शनास आले. यावेळी शेतकर्यांशी चर्चा करतांना आ.कुणाल पाटील यांनी सांगितले कि, लाल्या व इतर रोगामुळे कापूस पिकाचे नुकसान होत असून धुळे तालुक्यातील कापूस पिकाचा पंचनामा करुन नुकसान भरपाई देण्याची मागणी अधिवेशनात केली आहे. या पुढेही शेतकर्यांसाठी आवाज कापूस पिकाची नुकसान भरपाई मिळवून देण्यासाठी विधानभवनात लढणार असल्याचे सांगत आ.पाटील यांनी शेतकर्यांना धीर दिला.

संकलन : दिपक वाघ

CMYK

दैनिक **लक्ष महाराष्ट्र**





# श्रमिकनगर सातपूरला संत सावता महाराजांचा संजीवन समाधी सोहळा उत्साहात संपन्न











नाशिक । श्री.संत शिरोमणी सावता महाराज संजीवन समाधी सोहळ्यानिमित्त व श्री विठ्ठल रुक्मिणी, संत सावता महाराज मंदिर वर्धापन दिनानिमित्त श्रमिकनगर येथील माळी कॉलनीत अखंड हरिनाम सप्ताहाची सांगता महाराष्ट्रातील नामांकीत कीर्तनकार ह.भ.प.पुरुषोत्तम महाराज पाटील यांच्या काल्याच्या कीर्तनाने झाली.गेल्या ३४ वर्षापासून श्री संत सावता माळी मित्र मंडळ यांच्यावतीने हृदयश्रीमंत संत शिरोमणी सावता महाराज यांचा संजीवन समाधी सोहळा साजरा करत आहे.यानिमित्ताने यंदाही महाराष्ट्रातील नामांकित किर्तनकारांचे किर्तन सोहळे संपन्न झाले. यामध्ये दि. १३ जुलै रोजी ह.भ. प.सुनीताताई कातोरे संगमनेर, दि.१४ रोजी कीर्तनरत्न ह.भ.प. विशाल महाराज खोले मुक्ताईनगर, दि.१५ रोजी विनोदाचार्य कीर्तनकार ह.भ.प शिवा महाराज बावस्कर बुलढाणा, दि.१६ रोजी श्री संत शिरोमणी सावता महाराज यांच्या संजीवन समाधी सोहळ्यानिमित्त सकाळी ह.भ.प. सोपान महाराज सानप शास्त्री हिंगोलीकर यांचे कीर्तन झाले. तसेच सायंकाळी महाराष्ट्रातील युवा किर्तनकार ह.भ.प. समाधान महाराज भोजेकर जळगाव यांचे कीर्तन झाले. दि.१७ रोजी ह.भ.प गोपाळ महाराज, दि.१८ रोजी कीर्तनरत्न ह.भ.प. भागवताचार्य वासुदेव महाराज सोनवणे रावळगावकर, दि.१९ रोजी राष्ट्रीय धर्माचार्य, महाराष्ट्र भूषण, समाज प्रबोधनकार ह.भ.प. निवृत्ती महाराज देशमुख इंदुरीकर यांचे कीर्तन झाले. या किर्तन सोहळ्यास सातपूरसह परिसरातील भाविक हजारोंच्या संख्येने उपस्थित होते. दि.२० रोजी आवाजाचे जादूगर व आई माझी मायेचा सागर फेम ह.भ.प पुरुषोत्तम महाराज पाटील बुलढाणाकर यांचे काल्याचे किर्तन झाले.